RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क मो. 8482839451

बुधवार, ०४ जून २०२५ | वर्ष : ५ | अंक : १५७ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Wednesday, 04 June 2025 | Year : 5 | Issue : 157 | Daily | Rate: Rs. 5/-

# ऑपरेशन सिंदूरसंदर्भात विशेष अधिवेशनासाठी सरकार अनुत्सुक






नवी दिल्ली : ऑपरेशन सिंदूरच्या पहिल्या दिवशी भारताच्या झालेल्या नुकसानाबद्दल जनरल अनिल चौहान यांनी अलीकडेच माहिती दिली. त्यानंतर विरोधी पक्ष विशेष संसद अधिवेशन बोलावण्यासाठी पुन्हा एकदा आग्रह धरला जात असताना सध्या असे अधिवेशन बोलावण्याची कोणतीही योजना नाही, असे सरकारी सूत्रांचे म्हणणे आहे. 'सध्या तरी अशी कोणतीही योजना नाही. विशेष अधिवेशन बोलावण्याबाबत अद्याप कोणतीही चर्चा झालेली नाही. या महिन्यात ते होण्याची शक्यताही नाही', असे एका वरिष्ठ सूत्राने सोमवारी सांगितले. लोकसभा आणि राज्यसभा सचिवालयांना याबाबत माहिती देण्यात आली आहे, असेही सरकारी अंतर्गत सूत्रांनी सांगितले. आणीबाणीच्या 50 व्या वर्धापन दिनानिमित्त 25 जून रोजी सरकार विशेष अधिवेशन बोलावू शकते, अशीही अटकळ होती. मात्र, आता तीदेखील शक्यता नाही. शनिवारी संरक्षण दलप्रमुख जनरल चौहान यांनी दोन मुलाखतींमध्ये केलेल्या टिप्पण्यांमुळे विरोधी पक्षांनी 'ऑपरेशन सिंदूर'वर विशेष सत्र बोलावण्याची मागणी नव्याने सुरू केली. मे महिन्यात झालेल्या संघर्षादरम्यान भारताला सुरुवातीला नुकसान सहन करावे लागले आणि त्यानंतर पाकिस्तानवर निर्णायक विजय मिळविण्यासाठी रणनीती बदलावी लागली, असे त्यांनी सांगितले. कारवाईदरम्यान लढाऊ विमाने पाडल्याची ही पहिली अधिकृत कबुली होती.

सोमवारी राजदचे खासदार मनोज झा यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून पाकिस्तानविरुद्ध अलीकडच्या सीमापार कारवाया, त्याचे परिणाम व पुढील मार्ग यांवर चर्चा करण्यासाठी अधिवेशन बोलावण्याची विनंती केली. समाजवादी पक्षाने म्हटले आहे की, हे अधिवेशन विलंब न करता, बोलावले गेले पाहिजे; जेणेकरून सरकार भारताचे परराष्ट्र धोरण आणि संरक्षण धोरण देशासमोर मांडू शकेल. 'संरक्षण दलप्रमुखांचे भाष्य नियमाबाहेरचे नाही'. त्याशिवाय एअर ऑपरेशन्सचे महासंचालक एअर मार्शल ए. के. भारती यांनीही 11 मे रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत तसेच संकेत दिले होते. संरक्षण दलप्रमुखांच्या विधानामुळे भारताला झालेल्या नुकसानीबद्दलच्या अटकळींना पूर्णविराम मिळेल, असेही एका सूत्राने सांगितले.

भाजपा नेत्यांनी सांगितले की, आणीबाणीच्या 50 व्या वर्धापन दिनानिमित्त अधिवेशन बोलावण्याच्या काही सूचना असल्या तरी पक्षाने या मुद्द्यावर अद्याप चर्चा केलेली नाही. दरम्यान, त्यांनी असेही सांगितले की, पक्ष या मुद्द्यावर काँग्रेसला लक्ष्य करण्यासाठी देशभरात कार्यक्रम आयोजित करील.

22 एप्रिलच्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पहिल्यांदाच ही अशी मंत्रिमंडळाची बैठक होत आहे. तेव्हा या बैठकीत विरोधकांच्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी काय रणनीती आखली जाईल हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. तर दुसरीकडे, सरकार इतक्या दिवसांनंतरही विशेष अधिवेशनासाठी तयार नसल्याने विरोधक आता कोणता नवा मुद्दा हाती घेतली हेही महत्त्वाचे आहे

> “ सिंगापूरमध्ये संरक्षण दलप्रमुखांनी (सीडीएस) दिलेल्या मुलाखतीत केलेल्या वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर काही अत्यंत महत्त्वाचे प्रश्न विचारले गेले पाहिजेत. संसदेचे विशेष अधिवेशन त्वरित बोलावले, तरच हे करता येईल'.
> – **काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे**

**काँग्रेसने विशेष सत्रासाठी विरोधी पक्षांकडून स्वाक्षऱ्या गोळा केल्या आहेत. त्यांनी सरकारला `ऑपरेशन सिंदूर'पासून सर्व पक्षांना विश्वासात घेऊन संरक्षण तयारी आणि रणनीती यांवर चर्चा घडवून आणण्याचे आवाहन केले आहे. काँग्रेसव्यतिरिक्त तृणमूल काँग्रेस, द्रमुक, राजद, डावे पक्ष, समाजवादी पक्ष (सपा) व इंडियन युनियन मुस्लिम लीग यांनी विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी केली आहे.**

## ऑपरेशन सिंदूरबाबत 16 विरोधी पक्षांचे मोदींना पत्र

नवी दिल्ली : पहलगाम हल्ल्यानंतर भारताने ऑपरेश सिंदूरद्वारे पाकस्तानातील अनेक दहशतवादी अड्डे उद्धवस्त केले. सरकारच्या या कारवाईबाबत देशभरातून कौतुक होत आहे. मात्र, या ऑपरेशनबाबत सरकार पारदर्शक नसल्याचा आरोप करत विरोधी पक्षांनी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी तीव्र केली आहे. याच पार्श्वभूमीवर आज (3 जून) दिल्लीतील कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये I.N.D.I.A आघाडीच्या प्रमुख नेत्यांची बैठक बोलावण्यात आली. जयराम रमेश, संजय राऊत, राम गोपाल यादव, मनोज झा, डेरेक ओब्रायन हे कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये पोहोचले होते. या बैठकीनंतर 16 विरोधी पक्षांनी प्रधानमंत्री मोदींना पत्र लिहून संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी केली आहे. या पत्रात पहलगाम, पूंछ, उरी, राजौरी येथील दहशतवादी हल्ले आणि भारत-पाक संघर्ष यासारख्या संवेदनशील मुद्द्यांवर संसदेत मुक्त चर्चेबद्दल चर्चा करण्यात आली आहे. तृणमूल काँग्रेसचे खासदार डेरेक ओब्रायन यांनी मीडियाशी संवाद साधताना म्हटले की, '16 विरोधी पक्षांनी प्रधानमंत्रींना पत्र लिहून संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी केली आहे. सरकार संसदेला जबाबदार आहे आणि संसद जनतेला जबाबदार आहे. सर्व विरोधकांना वाटते की, केंद्र सरकारने केवळ आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर विधाने करू नयेत, तर संसदेतदेखील संवाद साधावा.' काँग्रेसचे खासदार दीपेंदर सिंह हुडा म्हणाले की, 'कठीण काळात विरोधी पक्षांनी लष्कर आणि सरकारला पूर्ण पाठिंबा दिला. जेव्हा अमेरिकेने युद्धविरामाची घोषणा केली, तेव्हा आम्हाला वाटले की, लष्कराचे आभार मानण्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले पाहिजे. दहशतवादाविरुद्धच्या भविष्यातील रणनीतीवर चर्चा करणेही आवश्यक आहे.'




## कन्नड भाषेच्या वादावरुन उच्च न्यायालयाने अभिनेत्याला सुनावले

कर्नाटकात : कर्नाटक उच्च न्यायालयाने अभिनेते कमल हासन यांच्यावर जोरदार टीका केली आहे. दाक्षिणात्य अभिनेते कमल हासन हे सध्या वादात अडकले आहेत. कन्नड भाषेबाबत कमल हासन यांनी वादग्रस्त वक्तव्य केले होते. ज्याची चांगलीच चर्च झाली. त्यामुळे कर्नाटकात त्यांचा आगामी ठग लाईफ या सिनेमावर बंदी घालण्याची मागणी करण्यात येते आहे. या सगळ्यानंतर कमल हासन यांनी कर्नाटक उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता. मात्र आपल्या वक्तव्यांबाबत माफी न मागणाऱ्या कमल हासन यांना कर्नाटक उच्च न्यायलायने खडे बोल सुनावले आहेत. या याचिकेवर न्यायमूर्ती जास्टिस नागप्रसन्ना यांनी म्हटले आहे की कुठल्याही नागरिकांच्या भावना दुखावण्याचा अधिकार कुणालाच नाही. आपल्या देशाची रचना प्रांतवार झालेली आहे ती भाषेच्या आधारावर झाली आहे. एखादी पब्लिक फिगर असणारी व्यक्ती अशा प्रकारे बोलत असेल तर काय होईल? कुठलीच भाषा दुसऱ्या भाषेपासून जन्माला आलेली नाही. या सगळ्याने फक्त वातावरण बिघडवण्याचे काम केले आहे. या बदल्यात लोक काय म्हणत आहेत? कमल हासन यांनी माफी मागावी. यात काय चूक आहे? असा सवाल कर्नाटक उच्च न्यायालयाने केला आहे.




## ऑस्ट्रेलिया पोलिसांची भारतीय तरूणाला जबरदस्त मारहाण



नवी दिल्ली : ऑस्ट्रेलियातील एका 42 वर्षीय भारतीय वंशाच्या व्यक्तीला अटक करण्याचा प्रयत्न करत असताना पोलिसांनी त्याला जबरदस्त मारहाण केली. त्याच्या मानेवर गुडघा दाबत त्याला मारहाण केल्याने ही व्यक्ती आता रुग्णालयात दाखल आहे. पोलिसांच्या या अमानुष मारहाणीमुळे गौरव कुंडी ही व्यक्ती सध्या कोमात आहे, त्यामुळे या प्रकरणाला आता गंभीर वळण आले आहे. ॲडलेडच्या पूर्व उपनगरात घडलेल्या या घटनेनंतर 42 वर्षीय भारतीय वंशाचा गौरव कुंडी हा सध्या रॉयल ॲडलेड रुग्णालयात लाईफ सपोर्टवर आहे. त्यांच्या कुटुंबीयांनी पोलिसांवर आरोप केला आहे की, पोलिसांनी त्याला अटक करतांना अधिक बळाचा वापर केला आणि मारहाण केली, यामुळे त्याच्या मेंदूला आणि मानेला गंभीर दुखापत झाली आहे. त्याची पत्नी अमृतपाल कौरच्या म्हणण्यानुसार, ही घटना पेनेहॅम रोडवर घडली. त्यांच्यातल्या किरकोळ वादाला घरगुती हिंसाचाराचा प्रकार समजून गस्त घालत असलेल्या एका पोलिस पथकाने त्यांना थांबवले.

## पाकिस्तानातील प्रसिद्ध इन्फ्लुअन्सरची राहत्या घरात हत्या



नवी दिल्ली : पाकिस्तानातील इस्लामाबाद येथील एका तरुण इन्फ्लुअन्सरची हत्या करण्यात आली. सना युसूफ असे तिचे नाव असून राहत्या घरी तिच्यावर गोळीबार करण्यात आला. अप्पर चित्रालमधील प्रसिद्ध कंटेंट क्रिएटर सना युसूफचे 4 लाखांहून अधिक सबस्क्राइबर्स आहेत, तिला भेटायला आलेल्या एका नातेवाईकाने तिच्यावर जवळून गोळ्या झाडल्या. घटनेनंतर हल्लेखोर लगेचच घटनास्थळावरून पळून गेला. पोलिसांनी शोध मोहीम सुरू केली आहे आणि ते पाकिस्तानमध्ये सर्रासपणे होणाऱ्या ऑनर किलिंगसह सर्व संभाव्य कारणांचा तपास करत आहेत. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, गोळीबार करण्यापूर्वी संशयिताने सनासोबत तिच्या घराबाहेर संभाषण केले.

## नियंत्रण रेषा ओलांडणाऱ्या सुनीताची एनआयए' कडूनही चौकशी

नागपूर : पाकिस्तानात जाण्यासाठी एलओसी ओलांडणाऱ्या नागपुरातील सुनीता जामगडेच्या चौकशीसाठी काश्मीर पोलीस नागपुरात दाखल झाली असल्याची माहिती आहे. कपिलनगर पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या संत कबीर नगर येथील रहिवासी सुनीता जमगडे काही दिवसांपूर्वी नियंत्रण रेषा (एलओसी) ओलांडून बेकायदेशीरपणे पाकिस्तानात गेल्या होत्या. सुनीता कारगिलजवळील हुंडरमन गावातून पाकिस्तानच्या एका धार्मिक नेत्याला भेटण्यासाठी एलओसी ओलांडून पाकिस्तानात गेल्या होत्या. भारताची सीमा पार करत पाकिस्तानात गेलेली सुनीता मागील आठवड्यात नागपुरात परत आली होती. दरम्यान, सुनीता जामगडे या महिलेला काश्मीर पोलीस तपासाकरता काश्मीरला ही घेऊन जाऊ शकतात, अशी देखील शक्यता वर्तवली जात आहे. त्यासाठी न्यायालयाच्या आदेशानंतर वॉरंट घेऊन ही कारवाई केली जाणार असल्याचे बोलले जात आहे.

## एसटी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात 53 टक्के वाढ



मुंबई : राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना जूनपासून 53 टक्के महागाई भत्ता मिळणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केली. मूळ वेतनावर 53 टक्के महागाई भत्ता अदा करण्यात येईल असे एकनाथ शिंदेंनी सांगितले. महागाई भत्ता वाढीमुळे सरकारच्या तिजोरीवर दर महिन्याला 19 कोटींचा आर्थिक भार वाढणार आहे. महागाई भत्त्याच्या थकबाकीबाबत निधीची उपलब्धता पाहून यथावकाश निर्णय घेण्यात येईल, असंही एकनाथ शिंदेंनी स्पष्ट केले. एसटी कर्मचाऱ्यांनी राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढीचा दर लागू केला आहे. महागाई भत्याची 2018 पासूनची थकबाकी प्रलंबित आहे. न्यायालयाने थकबाकी देण्याबाबतचा निर्णय दिल्यानंतरही त्याची अंमलबजावणी झालेली नव्हती. त्यामुळे आता महागाई भत्ता 53 टक्के इतका लागू करण्यात आला आहे, अशी घोषणा एकनाथ शिंदेंनी केली. सध्या एसटी महामंडळाच्या अनेक विभागांमध्ये कुशल मनुष्यबळाचा अभाव आहे. अनेक ठिकाणी चांगले शिक्षण अधिकारी आवश्यक असून विशेषतः भविष्यात पीपीपी तत्त्वावर विकसित होणाऱ्या एसटीच्या जागे बाबतीत बांधकाम विभागाकडे कुशल अभियंत्यांची गरज भासणार आहे. त्यामुळे सध्या रिक्त असलेल्या अभियंत्यांच्या जागा करार पद्धतीने आणि सरळ सेवा भरतीच्या माध्यमांतून भरण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## एनडीएमध्ये जागावाटपावरून वाद होणार?

नवी दिल्ली : महाराष्ट्र, हरियाणा व त्यापाठोपाठ दिल्ली विधानसभा निवडणूक जिंकून भाजपाने आपल्या विजयाचा सिलसिला कायम ठेवला. राजधानीत तब्बल 27 वर्षानंतर सत्तास्थापन केल्यानंतर भाजपाने आपले लक्ष्य बिहारच्या निवडणुकीवर केंद्रित केले आहे. यावर्षीच्या अखेरीस बिहारमध्ये विधानसभा निवडणूक होणार आहे. त्यासाठी भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने आतापासूनच जोरदार तयारी सुरू केली आहे. मात्र, जागावाटपाचा मुद्दा व मुख्यमंत्रिपदावरून एनडीएमध्ये वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामागचे कारण म्हणजे, भाजपाचा प्रमुख मित्रपक्ष असलेल्या लोक जनशक्ती पार्टीचे (राम विलास) प्रमुख चिराग पासवान यांनी बिहार विधानसभा निवडणूक लढविण्याचे संकेत दिले आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळात असलेले केंद्रीय मंत्री चिराग पासवान हे आगामी निवडणुकीत अनेक जागांवर दावा करण्याची शक्यता आहे. बिहारमध्ये विधानसभेच्या एकूण 243 जागा आहेत आणि त्यापैकी 38 जागांवर एनडीएचे घटक पक्ष एकमेकांविरोधात दावा करू शकतात, असे सांगितले जात आहे. पक्षातील अंतर्गत सूत्रांनुसार, ज्या जागांवर लोजपाच्या उमेदवारांनी जेडीयूच्या उमेदवारांपेक्षा जास्त मते घेतली होती, त्याच जागांवर चिराग पासवान हे दावा करण्याची शक्यता आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीवेळी एकसंध असलेल्या लोक जनशक्ती पार्टीने 38 पैकी 32 जागांवर जेडीयूच्या उमेदवारांपेक्षा जास्त मते घेतली होती. या 32 पैकी किमान 26 जागांवर 'लोजपा'ने जेडीयूच्या पराभवाच्या फरकापेक्षा अधिक मते मिळवली होती. विशेष म्हणजे, यातील पाच जागांवर 'लोजपा'चे उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर होते. तर एक जागा त्यांनी 333 मतांच्या फरकाने जिंकली होती.



मदतनिस पाहिज
सुगतनगर, इंदोरा परिसरातील रहिवासी असणारा एक पदविधर मदतनिस पाहिजे.
पगार ९०००/- रूपये महिना
संपर्क
मो. 7507661569

## काँग्रेसच्या शेतकरी यात्रेची भाजपला भीती का?



नागपूर : काँग्रेस प्रदेशाध्यक्षांकडे रिकामा वेळ भरपूर आहे, त्यामुळे ते सारखे यात्रा काढत असतात, काँग्रेसच्या यात्रेला प्रतिसाद मिळत नाही, त्या निरर्थक आहेत, अनेक वर्ष सत्ता उपभोगणाऱ्या काँग्रेसने शेतकऱ्यांसाठी काय केले ते आधी सांगावे, असे एक नव्हे तर अनेक आरोप भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसच्या कृषी आत्मसन्मान यात्रेपूर्वी केले. यावरून भाजपने या यात्रेचा किती धसका घेतला याची प्रचिती येते.

प्रदेश काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली आजपासून यवतमाळ जिल्ह्यातील दाभाडी या गावातून शेतकरी सन्मान यात्रेला सुरूवात होत आहे. हे तेच दाभाडी गाव आहे जेथे 2014 च्या लोकसभा निवडणूक प्रचार काळात नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांना त्यांचे जीवनमान बदलण्याचे अनेक आश्वासने दिली होती. मात्र काँग्रेसपेक्षा भाजपने ते अधिक गांभीर्याने घेतल्याचे या पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांच्या टिकेवरून दिसून येते. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री शिवाजीराव मोघे यांनी यात्रेबाबत नागपुरात येऊन पत्रकार परिषद घेतल्यावर लगेच दुसऱ्या दिवशी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी या यात्रेवर सडकून टीका केली. ते म्हणाले काँग्रेसची यात्रा निरर्थक आहे, तिला लोक प्रतिसाद देत नाही. ही यात्रा निरर्थक आहे, तिला प्रतिसाद मिळत नाही हे भाजप नेत्यांना ठाऊक असूनही ते त्याची दखल का घेतात असा सवाल काँग्रेस जणांनी केला आहे. मात्र हे करताना दाभाडीत 2014 मध्ये मोदींनी शेतकऱ्यांना दिलेल्या (हमीभावापेक्षा अधिक भाव, उत्पादन खर्च अधिक नफा समाविष्ट करून कृषीमालाची दरनिश्चिती व अन्य) दिलेल्या आश्वासनाचे काय झाले याबाबत अवाक्षरी काढले नाही. याचा अर्थ ती आश्वासने अद्यापही पाळल्या गेली नाही हे स्पष्ट होते व याचीच आठवण करून देण्यासाठी ही यात्रा असल्याने ती भाजपच्या जीव्हारी लागल्याचे दिसून येते.

काँग्रेसने त्यांच्या सत्ताकाळात काय केले? असा प्रश्न भाजप प्रदेशाध्यक्षांनी केला. पण त्यांना डॉ. मनमोहनसिंग प्रधानमंत्री असताना त्यांनी केलेली कर्जमाफी आठवली नाही तसेच भाजपने 2024 च्या विधानसभा निवडणुकीत कर्जमाफीचे आश्वासन देऊन ते पाळले नाही याचेही विस्मरण झाले. अलीकडेच राज्य सरकारने नैसर्गिक आपत्तीसाठी करण्यात येणाऱ्या मदतीच कपात केली आहे. विधानसभा निवडणुकीच्या आधी केंद्राच्या निकषापेक्षा अधिक मदत करण्याचा आव आणणाऱ्या महायुती स रकारने आता केंद्र व राज्यात समान नियम असावे असे कारण देऊन या कपातीचे समर्थन केले आहे. एकूणच शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनाबाबत नेहमीच टोलवाटोलवी व गुळमुळीत भूमिका घेणाऱ्या महायुतीतील नेत्यांना काँग्रेसच्या यात्रेमुळे त्यांची पोलतर खुलणार नाही ना याची भीती वाटू लागली, अशी टीका आता होत आहे.

> शेतकरी जगाचा पोशिंदा आहे, पण आज त्याचे मोठे हाल होत आहेत. शेतकऱ्याने आपला माल साठवून ठेवला, भाव मिळेल अशी आशा होती, पण तसे झाले नाही. सोयाबीनला भाव नाही, मात्र त्यापासून तयार होणाऱ्या तेलाला मोठा भाव आहे. यातून कंपन्या प्रचंड नफा कमवत आहेत, पण शेतकऱ्याला काहीच मिळत नाही. घर-घर तिरंगा उपक्रमात पॉलिस्टरचा झेंडा लावला गेला. जर कापडाचा झेंडा वापरला असता, तर कापसालाही भाव मिळाला असता. पण सरकारचा हेतू शेतकऱ्याच्या भल्याचा नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवायच्या असतील, तर ही परिस्थिती तातडीने बदलायला हवी, असे ते म्हणाले. ही पदयात्रा केवळ दाभडी ते आर्णी एवढी मर्यादित नाही, तर ती दिल्लीपर्यंत नेण्यात येणार आहे. `आज करोगे या मरोगे' अशी परिस्थिती आहे. म्हणूनच ही लढाई फक्त काँग्रेसची न राहता सर्वसामान्य जनतेची आहे. शेतकरी आपल्या पोटासाठी लढतो, जवान देशासाठी लढतो, पण सरकार कुणासाठी लढते?
> – **हर्षवर्धन सपकाळ**

खासदार प्रतिभा धानोरकर यांनीही प्रधानमंत्री मोदींना 2014 साली दिलेली आश्वासनांची आठवण करून देण्यासाठी या पदयात्रचे आयोजन असल्याचे सांगितले. भाजप सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे, असे त्या म्हणाल्या. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी काँग्रेसचा लढा अधिक तीव्र करण्याचा निश्चय यावेळी काँग्रेस नेत्यांनी केला. या पदयात्रेत काँग्रेसचे आजी-माजी आमदार, तालुका व शहराध्यक्ष, महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांसह शेकडो नागरिकांनी सहभाग घेतला.

2014 मध्ये दाभडी गावात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ज्या शेतकऱ्याच्या शेतात भेट देऊन पिकांची पाहणी केली, ग्रामस्थांशी संवाद साधून मोदी यांच्या `चाय पे चर्चा' या कार्यक्रमानंतर गावात काय बदल झाले, जीवनमान उंचावले का, रोजगार वाढले का, मूलभूत समस्या सुटल्या का, पिकांना हमी भाव मिळाला का, असे विविध प्रश्न विचारले. मात्र गेल्या 11 वर्षात गावात, राहणीमानात कुठलाच बदल झाला नसून, मोदींच्या भेटीमुळे फायदा होण्याऐवजी नुकसानच झाल्याच्या प्रतिक्रिया ग्रामस्थानी दिल्या.

वाचकांना आवाहन




दैनिक बहुजन सौरभची नागपूर शहरात सतत मागणी वाढत आहे. आपल्या घरी जो पेपर देतो. त्यांच्याकडे दैनिक बहुजन सौरभची मागणी करावी. आमच्या वर्तमानपत्राची स्वतंत्र अशी कोणतीही वितरण व्यवस्था नाही.
बहुजन सौरभ
दैनिक बहुजन सौरभ नागपूर शहरात सर्वच पेपर विक्री केंद्रावरती उपलब्ध आहे. याची वाचकांनी नोंद घ्यावी.
मुख्य संपादक
दैनिक बहुजन सौरभ

“ अडचणींना तोंड देऊनही सतत प्रयत्नरत राहा... ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



## संपादकीय

# अप्रत्यक्ष अन्याय व सावधगिरी

स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे, ही हाक देणाऱ्या केसरीकार लोकमान्य टिळक यांना मूकनायककार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला पण स्वराज्यात वाटा पाहिजे अशी हाक दिली होती. धर्म आणि धर्मग्रंथाने नाकारणे आणि उच्च जातीच्या लोकांनी खालच्या जातीच्या लोकांना दूर लोटणे, त्यांच्यावर चौफेर अन्याय करणे, महिलांना पूर्ण अधिकार नाकारणे, ही धर्मग्रंथाने दिलेली मान्यता आहे, असे उघडपणे मुकनायक वृत्तपत्रात छापून येत होते. नुकताच महात्मा फुले चित्रपट प्रदर्शित झाला. उघडा डोळे, बघा निट असा विचार देऊन गेला आहे. तर पेशवाईचा अन्यायकारक काळ आणि आजच्या धर्मग्रंथाचा छुपा काळ सारखेच आहे तर देशात 1949 पासून भारतीय संविधान ग्रंथ आहे. राज्यात आदिवासी, वंचित, उपेक्षित, भटके, महिला स्वराज्यात वाटा घेण्यासाठी धडपड करित आहे. आशा होती की स्वराज्य मिळेल तर सर्व काही मिळेल. पण तसे झाले नाही. मूठभर लोकांना स्वराज्याचा फायदा झाला आहे.

15 ऑगस्ट 1947 साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. अमानवी पारतंत्र्याच्या खाईत कढत कुढत जगणारा समाज आनंदी झाला. अंधारलेल्या आपल्या झोपडीमध्ये स्वातंत्र्याची किरणे मानवतेच्या पावलाने आत येतील, आपल्या मोडक्या-तोडक्या दाराला समतेच्या फुलांचे तोरण बांधले, या आशेने हा समाज आशाळभूतपणे डोळे किलकीले करून पाहू लागला होता. मात्र, त्यांचा भ्रमनिराश झाला आणि अंतरमनात प्रश्न निर्माण झाला. हे स्वातंत्र्य फक्त मूठभर लोकांसाठीच निर्माण झाले आहे का? अनुसूचित जाती, जमाती, मागासवर्गीय, भटके, विमुक्त अशा द्विधा मानसिकतेच्या गर्तेत अडकलेल्या समाजाला स्वराज्यात सुराज्य येईल असे वाटले पण तसे झाले नाही. अमानवी पारतंत्र्याच्या व्यवस्थेला गाडून टाकणारी बुद्धत्वाचा विचार देणारी, मानवी मूल्यांच्या स्वातंत्र्याची शृंखला निर्माण करणारी, मान वर करून पाहायला लावणारी एक वैचारिकता, एक विचारशक्ती, एक समताशाही समाज निर्माण करणारी राज्यघटना महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अथक प्रयत्नाची पराकाष्ठा करून या देशात निर्माण झाली. ती या देशाच्या भल्यासाठी आणि यातूनच एक लोकशाही सूर्य डॉ. बाबासाहेबांनी जन्माला घातला व त्याची किरणे दूर दूर पसरली तो दिवस होता 26 जानेवारी 1950. प्रजासत्ताक दिवस होय. पण स्वराज्यात आमच्या वाट्याला मिळालेली सोय सवलत ही जास्त काळ मिळाली नाही. असे खेदाने म्हणावे लागेल. 1990 पर्यंत शासकीय योजना आणि शासकीय नोकर भरती झाली. 2014 च्या काही प्रमाणात नोकऱ्या मिळाल्या. पण त्यानंतर ही गती मंद झाली. खाजगीकरण जे सुरू झाले ते मोठ्या प्रमाणावर सुरूच आहे तर आता सरकारी क्षेत्रात छोटी कामे ठेकेदार पद्धतीने सुरू आहेत. याला म्हणतात अप्रत्यक्षपणे धर्म अन्याय आणि धर्म ग्रंथाची अंमलबजावणी होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर खरेच दूरदृष्टीचे होते म्हणून त्यांनी आम्हाला माणसासारखे जगायला शिकविले, अन्यायाविरुद्ध लढायला शिकविले. मग हेच आमचे चांगले वागणे-जगणे-राहणे काहींच्या नाकात दम करायला लागले आणि यातूनच त्यांना जातीयतेच्या शिंका यायला लागल्या. आमच्या उद्धारकर्त्यांच्या बोटाकडे पाहून ज्या-ज्या वाटेने आम्ही जाण्याचा प्रयत्न केला. त्या प्रत्येक वाटेवर या जातीयवाद्यांनी विषमतेचे काटे पेरण्याचे काम सुरू केले. मात्र, धम्मबांधवांनो मला तुमच्या सार्थ अभिमान आहे. आपले पाय कितीही रक्तबंबाळ झाले, तरी तुम्ही, मी, आपण साऱ्यांनी भीमत्वाची व बुद्धत्वाची वाट सोडलेली नाही. हे जग उघड्या डोळ्यांनी पाहत आहे, नुकतीच अशीच एक खोड काढण्यात आली. पण त्या खोडीला आपण भीक घातली नाही. भिकार विचार असणारी भिकाऱ्यांची एक टोळी विषमतेचे काटेरी अस्त्र घेऊन रस्त्यावर उतरली. काहीही कारण नसताना जातीयतेचा कांगावा करू लागली आणि आपली औकात शोधू लागली. पूर्वीचे महार आणि आताचे बौद्ध यांनी सर्व क्षेत्रात पाय ठेवला आहे. अनुसूचित जातीत या जाती येतात त्यापैकी पूर्वीचे महार आणि आताचे बौद्ध यांना लाभ झाला. असा कांगावा करून अनुसूचित जाती येणाऱ्या जातीत पुन्हा एकदा बौद्ध लोकांना एकाएकी पडण्याचा निरंतर प्रयत्न सुरू आहे. शिक्षण, वसतिगृह, शिष्यवृत्ती, नोकरी, यासाठी कोण लढाई करतो हा विचार करणे गरजेचे आहे. अनुसूचित जाती जमाती वर झालेला अन्याय-अत्याचार रस्त्यावर आंदोलने कोण करतात हा सारासार विचार करणे गरजेचे आहे. अनेक खाजगी उद्योगात आडनाव आणि अप्रत्यक्ष जातीचा शोध घेऊन काम दिल्या जात नाही. मग सांगा स्वराज्यात आमचा वाटा आहे का याचे उत्तर नाही असेच मिळेल. ज्यांची थोडी फार परिस्थिती बरी त्यांना जातीयवादी व्यवस्थेची झळ बसत नाही. पण महासत्तेच्या काळात आपल्या गटबाजी आणि नेतृत्वहीन कृत्यामुळे आपण 50 वर्ष मागे आहोत. अजून तर खूप मागे तर जाणार नाही याकडे सर्वांनी मिळून विचार करणे गरजेचे आहे. ■ ■

बहुजन सौरभ

# साधुचरित बौद्धपंडित : प्रा. डॉ. धर्मानंद कोसंबी

आधुनिक भारताच्या इतिहासात बौद्ध धर्माचे प्रसारक प्रचारक म्हणून जे काही तत्त्वज्ञ पंडीत अभ्यासक होऊन गेले. त्यात साधुचरित त्रिखंडपंडित प्रा.डॉ. धर्मानंद कोसंबी यांचे नाव प्रामुख्याने येते. दामोदर आणि आनंदीबाई कोसंबी या उभयतांच्या सुसंस्कृत परिवारात 9 ऑक्टो. 1876 ला गोवा प्रांतातील साखवाळ या गावी त्यांचा जन्म झाला. त्यांना शिक्षणाची सुरूवात घरीच करावी लागली. कारण गोव्यात त्याकाळी हवी तसी शैक्षणिक दृष्ट्या मुळीच सोय नव्हती. बालविवाह प्रथा प्रचलित असल्यामुळे अवघ्या 15 व्या वर्षी विवाहबद्ध व्हावे लागले. वडील वयोवृद्ध त्यामुळे कौटुंबिक जबाबदारी येवून ठेपली. वाचन त्यांचे दांडगे होते. हातात जे पुस्तक लागेल ते मन:पूर्वक वाचून काढणे असा त्यांचा नित्यक्रम झाला होता. 1897 मध्ये विनायक कोंडदेव यांचे ‘बाळबोध’ या मासिकातील बुद्धाचे जीवन चरित्र वाचण्याचा अनपेक्षितपणे योगायोग लाभला व या क्षणाने त्यांच्या जीवनाची दिशाच अगदी एकदम बदलून गेली. बुद्धाविषयी आदर, गौरव, श्रद्धा आणि भक्ती दिवसेंदिवस दृढमुल होत गेली. समग्र मानवी जीवनात ज्या असंख्य संकटे विपत्ती – आपत्ती व समस्या उद्भवतात त्यातून अलिप्त राहण्याचा एकमेव अंतिम मार्ग म्हणजे दुसरे तिसरे काहीही नसून ते बुद्ध तत्त्वज्ञानात त्याची प्रचिती येवू शकते यावर त्यांचा ठाम विश्वास बसला. ते आपल्या स्वचरित्रातील कथनात म्हणतात ‘प्रपंचाचा जसजसा मला विट, किटकारा येत गेला, तसतसी माझी श्रद्धा उत्तरोत्तर वृद्धींगत होत गेली. अखेर माझे सर्वस्व केवळ बुद्धच आहे असे मनाला वाटू लागले. त्यामुळे काही न करता जीवनयापन केले, तर बुद्ध जीवनाचे ज्ञान संपादन करावे, असा दृढ संकल्प केला. आपण यापुढे कितीही यातना वा संकटे आलीत तरी बुद्धोपदेशाचे ज्ञान मला एकदाचे अवगत झाले तर खरेच या जीवनाचे निश्चितच काहीतरी सार्थक होईल!’

पाली भाषा साहित्याचे आद्य प्राध्यापक, प्रवर्तक, तत्त्वज्ञान आणि एक गाढे अभ्यासक समग्र जीवन सर्वस्वी धम्म प्रचारार्थ झोकून देणारे प्रा. डॉ. धर्मानंद कोसंबी यांचा रविवार 4 जून 23 ला स्मृती दिन त्या निमित्त.... बुद्धाच्या तत्त्वज्ञानाने हा झपाटलेला युवक शिक्षणाच्या उद्देशाने सर्वसंघ परित्याग करून 2 डिसें. 1899 मध्ये, केवळ अंथरण्यासाठी एक सतरंजी, एक तांब्या आणि 25 रुपये हातत घेवून सुप्रसिद्ध संस्कृत पंडीत सर प्रा.डॉ.आर.डी. भांडारकर यांच्या पुणे येथील संस्थानला भेट देवून त्यांच्याच माध्यमातून प्रा. धर्मानंदानी पंडीत महादेव शास्त्री यांचेकडून संस्कृत कौमुदीचा रीतसर अभ्यासक्रम पूर्ण केला. पुढे काशिनाथ मिश्रा यांच्या परिचयाने ‘जगत्गुरू गौतम बुद्ध चरित्र’ ही गोविंद नारायण काणेकृत ग्रंथ बघायला मिळाले ते तर सर एड्विन अर्नोल्ड यांच्या ‘दि लाईफ ऑफ एशिया’ या इंग्रजी मुळ ग्रंथाचा अनुवाद होता. ते या ग्रंथाविषयी आपले मत व्यक्त करतांना उद्गारतात, ‘त्यातील काही भाग वाचतांना अगदी माझा कंठ दाटून यायचा. डोळ्यातून अश्रू वाहत असत.’ पुणेत जास्त काळ राहता आले नाही. कारण प्रार्थना समाजाचे नेतृत्व स्वीकारावे व मोठ्या जोमाने कार्याला आरंभ करावा असा भांडारकरांचा आग्रह होता. डॉ. भांडारकर पुढे म्हणाले, ‘अरे धर्मानंदा, काय हे मेलेले मडे (बुद्ध धम्माचे) उभे करतो आहेस?’ पण धर्मानंदाच्या बुद्धीला ते मुळातच पटले नाहीत. डॉ. धर्मानंद ज्ञानकण मिळविण्यासाठी सारनाथ, नेपाळ ते बुद्धगया असा प्रवास प्रारंभ करून शेवटी बुद्धगयेत एका विद्वान भिक्खुंशी गाठ पडते. त्यानंतर त्यांच्या सल्ल्यावरुन महाबोधी सोसायटीची मदत मिळते. 21 मार्च 1902 ला श्रीलंकेचे प्रकांड विद्वान पू. भदन्त हिक्कडुवे सुमंगल नायक महाथेर उद्गाते, प्राचार्य विद्योदय परिवेण महाविहार यांचे हस्ते दीक्षित होतात. 18 ऑक्टो. 1902 मध्ये बर्माला जावून बुद्धाच्या विपस्सना संबंधीचे यथाभूत ज्ञान ग्रहण करुन 1906 मध्ये बर्मावरुन कोलकाताला परत आले आणि पुन्हा ग्रहस्थी जीवनात निमग्न झाले. दामोधर या पुत्र रत्नाचा लाभ झाला. कोलकाता विद्यापीठात पालीचे प्राध्यापक पदी नियुक्ती होते आणि नव्यानेच स्थापन केलेल्या नॅशनल कॉलेज, कोलकाता, बंगालमध्ये अध्यापनाचे कार्य करण्याचा व भारतात पाली या विषयाचे आद्य प्राध्यापक होण्याचा सार्थ बहुमान त्यांना प्राप्त झाला. कोलकाता विद्यापीठात व मुंबई विद्यापीठातही अध्यापन कार्य केले. पण नंतर 1908 ला त्यांनी बडोद्याचे नरेश सयाजीराव गायकवाड यांच्या निमंत्रणावरून पाली साहित्याचे अनेक ग्रंथ लेखन केले. फर्ग्यूसन कॉलेज, पुणे येथे 1912 ते 1918 पर्यंत अध्यापन केले. बनारस हिंदू विद्यापीठ, काशी विद्यापीठ आणि इंटर कॉलेज, सारनाथ, रशियातील लेनिनग्रँड व काही काळ गुजराथी विद्यापीठात अध्यापन करीत असत. इत्यादी ठिकाणी राहूनही त्यांनी अध्यापनासोबत लेखन कार्य चालु ठेवले. नॅशनल युनिव्हर्सिटी अध्यापन पालीच्या क्षेत्रात महनीय कामगिरी बजावली. प्रो. जेम्स. एच. वूड्स यांच्या निमंत्रणावरून अमेरिकेला चार वेळा गेलेत. ‘विशुद्धीमार्ग’ या ग्रंथावर अमेरीकेच्या हॉवर्ड विद्यापीठाने 1929 मध्ये प्रा.धर्मानंद कोसंबीना पीएच.डी. पदवी बहाल केली. अखंड निरपेक्ष मातृभूमीची सेवा करणारे आचार्य धर्मानंद कोसंबी महात्मा गांधीजींनी सुरू केलेल्या स्वातंत्र युद्धात धर्मानंदानी भाग घेतला होता. विशेषत: शिरोड्याच्या सत्याग्रहात त्यांचे नेतृत्व दिसून आले. 1931 चा असहकार चळवळीत भाग घेण्यापासून ते मिठाच्या सत्याग्रहातील कारावासापर्यंत ते पुढे 1947 पर्यंत म. गांधीजींच्या सेवाग्राम आश्रम, वर्धा येथे मृत्यू ओढवेपर्यंत सक्रीय कार्य करणारे असे ते गांधीवादी होते. 1930 साली त्यांनी असहकार चळवळीत सक्रीय भाग घेतला. 1931 पर्यंत एक वर्षाचा तुरुंगवास भोगावा लागला. पण एवढे होऊनही ते मात्र स्वस्थ बसले नाहीत. मुंबईच्या परेळ गिरणी कामगार मुंबई विभाग दलित लोकांच्या वस्तीत प्रथमत:च 1937 ला ‘बहुजन विहार’ तयार करुन बौद्ध विहाराची परंपरा भारतात रुजविली. मराठी–गुजराती भाषेत, बुद्ध, धर्म आणि संघ, बुद्ध लीला – सारसंग्रह, बौद्धसंघाचा परिचय, समाधिमार्ग, धम्मपद, बोधिचर्यावतार, भगवान बुद्ध, बोधिसत्त्व नाटक, जातककथा, बुद्धचरित, अभिधर्म, हिंदी संस्कृति आणि अहिंसा, पार्श्वनाथाचा चातुर्यास धर्म, निवेदन, आपबिती, खुलासा, पाली ग्रन्थ टीका – विसुद्धिमग्ग, विसुद्धिमग्गदीपिका (टीका), अभिधमत्थसंगहो – नवनीत टीका, समन्तपासादिका, बाहिरनिदानवण्णना, लघुपाठ (नित्यपाठ बौद्धसुत्र संग्रह) या ग्रंथाच्या माध्यमातून त्यांचे विचार सरळ असून ते त्यांनी स्पष्ट आणि निर्भीळपणे मांडले आहेत. जवळ–जवळ दिड डझन एवढी मौलिक ग्रंथसंपदा त्यांनी निर्माण केली. बुद्धाची क्रांतीकारी तत्त्वप्रणाली प्रभाविपणे आचरणात आणून त्यांनी त्या दृष्टीने मार्गक्रमण केले. अशाप्रकारे आधुनिक भारताच्या क्षितीजावर पाली भाषा साहित्य आणि बौद्ध तत्त्वज्ञानाचे अभ्यासक धम्म प्रसारार्थ कार्य करणारे प्रा. डॉ. धर्मानंद कोसंबी या थोर भारत मातेच्या सुपुत्राचे वयाचे 71 व्या वर्षी 4 जून 1947 ला सेवाग्राम वर्धा येथे शेवटी आपल्याला यापुढे काहीच कर्तव्य उरले नाही अशी भावना बळावून कर्माची प्रवृत्ती शिथील होत चालली व त्यामुळे देह धारण होईना अशा स्थितीत सल्लेखना करून स्वेच्छा मरण पत्करले. महात्मा गांधीजींनी कराखजा आश्वासन दिले होते की, कोसंबीच्या स्मारकाची योजना आखली होती. पाली साहित्याचे श्रीलंकेत प्रशिक्षणाची विद्यार्थ्यांना सोय करणे तसेच कोसंबी लिखीत समग्र वाङ्मयाचे अनेक भाषेत अनुवाद करून ते साहित्य अत्यल्प दरात प्रकाशित करण्याचा एक मोठा प्रकल्प म. गांधी समवेत संपला. त्या दृष्टीने स्वत:ला ‘सबके साथ सबका विकास’ आणि ‘स्वच्छ भारत’ म्हणविणाऱ्या महाराष्ट्र शासनाने सेवाग्रामस्थित दुर्लक्षित असलेली समाधी त्यांची चिरंतन स्मृती सतत तेवत ठेवण्यासाठी लोकांच्या दर्शनाकरिता स्मारकाचे कार्य हाती घेऊन हा अद्वितीय विद्वान प्रकांड पंडितांचा गौरवार्थ डॉ.धर्मानंद कोसंबी राष्ट्रीय पाली विद्यापीठ सरकारने निर्माणाधीन कार्य हाती घेऊन महाराष्ट्र राज्याच्या शासनाने यथोचित औचित्य साधुन सन्मान करावा हीच त्यांच्या स्मृती दिनानिमित्त खरी श्रद्धांजली होईल. ■ ■

स्मृतीदिन विशेष



बहुजन सौरभ



डॉ. भदन्त चिंचाल मेत्तानंद
मो. 94221 83185

# क्षत्रिय बुद्धांचे अनुयायी आहेत का?

भ. गौतम बुद्धांचा जन्म इ. स. पू. 563 मध्ये झाला. त्यावेळेस वैदिक हा ब्राम्हणी पंथ उदयास आलेला होता. यालाच ब्राम्हणांनी नतंर सनातन हे नाव देवून वैदिक पंथाचे स्तोम माजवले. याच वैदिक ब्राम्हणी पंथाने समाजात वर्णव्यवस्था निर्माण करून व आपला वर्ण श्रेष्ठ स्थानी ठेवून बहुजन समाजाचे शोषण करणारी नवी समाजव्यवस्था निर्माण केली. म्हणून बुद्धांनी आपला नवा बौद्ध धम्म स्थापून बहुजन समाजाला पहिल्यांदा बौद्धिक क्षमतेने जागृत केले व ब्राम्हणी वैदिक पंथाचे गुलामीचे तत्व नाकारून बहुजन समाजाला ज्ञानी बनवले.

पण या भ. गौतम बुद्धांचा जन्म ज्या महामाया व शुद्धोदन राजाच्या पोटी झाला होता, तो शुद्धोदन राजा हा या ब्राम्हणी वैदिक पंथाच्या वर्णव्यवस्था नियमाने क्षत्रिय होता. म्हणजेच भ. गौतम बुद्ध हे जन्माने क्षत्रिय वर्णीय होते. यामुळेच आजही क्षत्रिय वर्णीयांचा इतिहास तपासून पाहिला तर ते प्रथम पासूनचे बौद्ध धम्मिय आहेत व ब्राम्हणी वैदिक पंथाचे सांस्कृतिक व बौद्धिक गुलाम झाल्यानंतरचे हिंदू आहेत. यामुळे आजही क्षत्रियांना भ. बुद्ध आपल्या जवळचे वाटतात. आज स्वतःला क्षत्रिय समजणारा समाज बुद्धांपासून फार दूर गेल्याचे वाटत असले तरी व बुद्धांना ते आपला शत्रू मानत असले तरी, बुद्धांनी सांगितलेली नीती व बंधुत्ववादी विचार सरणी त्यांनी आजही सोडलेले नाही हेही तितकेच खरे आहे. याचे दुसरे एक कारण असे की, आज स्वतःला क्षत्रिय समजणाऱ्या क्षत्रिय वर्णातील एक मराठा समाज बळीराजाला आपला आद्य पुरूष मानून त्याची जयंतीही साजरी करायला लागलेला आहे. पण याच बळीराजाची वंशावळ तपासून पाहिली तर या वंशावळीतील सर्वच राजे हे बुद्धांच्या धम्म विचारांचे होते. कारण बळीवंशवळीतील कपिल हे प्रल्हाद राजाचे पुत्र होते. बळीराजा हा कपिल यांचा खापरपंजोबा व प्रल्हाद राजाचा पंजोबा होता. म्हणजेच हि वंशावळ बळी, बळीचा मुलगा बाणासुर, बाणासूराचा मुलगा हिरण्यकशिपू, हिरण्यकशिपूचा मुलगा प्रल्हाद व प्रल्हादाचा मुलगा कपिल होय. कपिल हे पुढे महान मूनी झाले व ते संख्याशास्त्राचे जनक, उद्गाते व प्रवर्तक होते. याच कपिल मुनींचा शुद्धोदन राजाच्या घराण्याशी पुरातन संबंध होता. कपिल मुनींच्या विचारांचा प्रभाव शुद्धोदनाच्या घराण्यावर होता. म्हणूनच या शुद्धोदन घराण्याने त्यांचे नाव आपल्या नगरीला दिले होते. म्हणून शुद्धोदन राजाच्या नगरीला कपिलवास्तू असे नाव पडले. हा इतिहास आहे. तसेच दुसरे असे की, भारतात राज्यस्थान राज्य हे क्षत्रियांचे राज्य म्हणून पूर्वीपासूनच इतिहासात प्रसिद्ध आहे. पण या राज्यात चितोड येथे व चितोड परिसरात भारतीय पुरातत्व खात्याला खोदकाम करतांना सर्वात जास्त बुद्धांच्या मूर्त्या सापडलेल्या आहेत. म्हणजेच क्षत्रियांचे राज्य राजस्थान हे पूर्वीपासूनचे बौद्ध धर्मीय राज्य होते हे इतिहासाने सिद्ध केलेले आहे. याच राज्यातून महाराष्ट्रात आलेला आजचा मराठा समाज हा मूळचा राजस्थानी आहे. याचा पुरावा म्हणजे आजही याच राजस्थानातून भाट महाराष्ट्रातील मराठ्यांची वंशावळ लिहून न्यायला महाराष्ट्रात येतात. तसेच दूसरे असे की, छ. शिवाजी महाराजांची राज्याभिषेका वेळची गागाभट्ट याला दिलेली वंशावळ ही याच राजस्थानातील सिसोदिया घराण्याची आहे. तसेच याच सिसोदिया घराण्याची वंशावळ राजर्षी शाहू महाराजांची आहे. येवढेच काय राजर्षी शाहू महाराजांच्या पूर्वीचे आडनाव हे भोसले अथवा घाटगे असे नव्हते तर ते राठोड हे होते. असा पुरावा त्यांच्याच ‘राजर्षी शाहू महाराज गौरवग्रंथ’ यात मिळतो. थोडक्यात सांगायचे म्हणजे आजचे स्वतःला क्षत्रिय समजणारे व क्षत्रिय वर्णासाठी भांडणारे सारेच हिंदू हे मूळचे बौद्ध आहेत. हे त्यांचा इतिहासच बोलतो आहे. पण याचे विशेष म्हणजे बुद्ध हे जन्माने क्षत्रिय व आजचा ब्राम्हणी वर्चस्वाखाली गेलेला आणि ब्राम्हणी गुलामीला आजपर्यंतच्या स्वतंत्र काळातही चिकटवून राहिलेला क्षत्रिय समाज, आपल्याच वर्णबंधू असलेल्या बुद्धांना का स्विकारत नाही? क्षत्रियांनाच क्षत्रिय का चालत नाही? बुद्धांना मानने म्हणजे त्यांचा धम्म स्विकारणे असे कधीच नसते. तर बुद्धांना मानने म्हणजे त्यांची न्याय, नीती, स्वातंत्र्य, समता, बंधुता व मैत्री यांचा स्विकार करणे होय. पण तसे क्षत्रिय करतांना दिसत नाहीत. उलट स्वतःला क्षत्रिय समजणाऱ्याच संपूर्ण वर्गाने आपण क्षत्रिय असल्याचा जागृत अभिमान व स्वाभिमान बाळगून बुद्धांची जयंती साजरी केली पाहिजे. तरच ते मुळातून क्षत्रिय आहेत हे मानता व म्हणता येईल. जर क्षत्रियच जर क्षत्रिय पुत्राला मानत नसतील व त्याला आपला वंशज, बंधू म्हणून स्विकारत नसतील तर ते क्षत्रिय कसे व कोणते? हा प्रश्न उपस्थित होतो. याचे उत्तर कोणत्याच स्वतःला क्षत्रिय म्हणणाऱ्या व समजणाऱ्या माणसाला देता येणार नाही. बुद्धांना मानने म्हणजे ज्ञानाला मानने होय. पण जर क्षत्रिय माणुस जर ज्ञानाला मानत नसेल व ते ज्ञान एका क्षत्रिय पुत्राने संपूर्ण जगाला दिलेले असतांनाही मानत नसेल, तर तो क्षत्रियच नाही हे सरळ सिद्ध होते. कारण क्षत्रिय म्हणून घेताना त्याला बंधुत्वाचे, सामाजिक समतेचे ज्ञान आलेले नाही हे सिद्ध होते. म्हणून हे समतेचे, बंधुत्वाचे व मैत्रीचे ज्ञान नसणारा माणूस हा इतर कोणाचे संरक्षणही करू शकत नाही व कोणाचे रक्षणही करू शकत नाही हेही आपोआपच सिद्ध होते. तेंव्हा क्षत्रिय हा रक्षण वर्ण आहे या म्हणण्याला व बोलण्याला कोणताच अर्थ उरत नाही. बोले तैसा चाले या संत तुकारामांच्या वचनाची या क्षत्रिय समाज घटकांनी कधीच पायमल्ली केली आहे हे तर सहजच समजून येते. म्हणूनच की काय हा संपूर्ण स्वतःला क्षत्रिय समजणारा समाजवर्ग नुसताच स्वतःला क्षत्रिय समजतो, पण तो ज्या ब्राम्हणी वर्णाचा बौद्धिक, सांस्कृतिक, धार्मिक व आता राजकीय गुलाम झालेला आहे, तो ब्राम्हणी वर्ग यांचा क्षत्रिय वर्ण मान्य करायला कदापि तयारच नाही. करण या ब्राम्हणी वर्णाने अगोदरच जाहीर करून टाकले आहे की, ‘परशुरामाने एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय करून टाकलेली आहे. यामूळे भारतीय धरतीवर क्षत्रिय हा वर्णच शिल्लक राहिलेला नाही.’ यामुळे क्षत्रियांनाच क्षत्रियत्वाचा खोटा अभिमान उराशी बाळगून आपलीच आपल्या उलट्या हाताने पाठ थोपवण्याशिवाय कोणताच पर्याय नाही. यामुळे क्षत्रिय म्हणून सारखा उर बडवण्याशिवाय व बरगड्या ताणून ‘आम्ही क्षत्रिय आहोत’ असे बोंबलून सांगण्याशिवाय कोणताच पर्याय आजच्या क्षत्रिय वर्गाकडे शिल्लकही राहिलेला नाही हे सिद्ध झालेले आहे. तसेच त्यांचा हा टाहो इतर समाज घटकांनी समजून घेवून ऐकायचेही सोडून दिलेले आहे. म्हणून आता स्वतःला क्षत्रिय समजणाऱ्या समाज घटकापूढे परत उलट्या पाऊली फिरून आपल्याच वर्णाच्या भावाला, म्हणजेच बुद्धांना स्वीकारल्या शिवाय कोणताच पर्याय शिल्लक राहिलेला नाही. हे पुन्हा नव्याने एकदा सिद्ध झालेले आहे. ■ ■



बहुजन सौरभ

दिपक गायकवाड
मो. 9765046493

# समता व समान व्यवहाराप्रति बुद्धाची संवेदनशीलता

**तथागतांनी भिक्खू संघाकरिता जे काही नियम पुरस्कृत केले ते सर्व त्यांच्यावरही बंधनकारक राहतील हे त्यांनी स्वत:च स्वेच्छने स्विकारले. ते संघाचे सर्व मान्य नायक होते. या कारणास्तव त्यांनी स्वत:करिता कधीही कोणत्याही नियम पालनापासून सर्वात मागितली नाही, किंवा कोणतीही विशेष सुविधा मागितली नाही, अशी सवलत किंवा सुविधा संघाने त्यांच्यावरील प्रेमापोटी, आदरापोटी त्यांना सहज बहाल केली असती. भिक्खू दिवसातून एकदाच अन्नग्रहण करतात हा नियम भिक्खूसह तथागतांनी स्वत:साठी स्वीकारला आणि आचरणात आणला. भिक्खूंनी संपत्ती धारण करू नये हा नियम भिक्खूंसहच तथागतांनी स्वीकारला आणि आचरणात आणला. भिक्खूजवळ फक्त तीन चिवरे असावी हा नियम भिक्खू सहच तथागतांनी स्वीकारला आणि आजारात आणला.**

एकदा तथागत शाक्य देशात कपिलवस्तू येथे वटवाटिकेत वास्तव्याला होते. तेव्हा तथागतांची पूर्वीची माता महाप्रजापती गौतमीने स्वहस्ते विशेष मागावर वस्त्रांची जोडी कातली आणि विणली. ही वस्त्राची जोडी घेऊन ती तथागताकडे आली आणि ती वस्त्रे तथागतांनी स्वीकारावी अशी तिने प्रार्थना केली. तथागतांनी तिला जे उत्तर दिले ते असे, ‘ती वस्त्रे संघाला द्यावी.’ दुसऱ्यांदा आणि तिसऱ्यांदा गौतमीने आपली प्रार्थना पुनरुक्त केली पण तिला तेच उत्तर मिळाले. त्यानंतर भंते आनंद हस्तक्षेप करून म्हणाला, ‘मातेच्या मृत्यूनंतर गौतमीने तथागतांना पोटच्या पुत्राप्रमाणे सांभाळले. आई म्हणून तिने तथागताची सेवा केली. तिने आपल्या भगिनी पुत्राला स्तनपान करविले. अशा गौतमीने आणलेल्या भेटवस्तूचा तथागतांनी स्वीकार करावा अशी माझी प्रार्थना आहे,’ तरीही तथागतांचा आग्रह होता की वस्त्रे संघाला दिली जावी. आरंभी संघाचा असा नियम होता की भिक्खूंची वस्त्रे उकिरड्यावरील चिंध्यापासून तयार करण्यात यावी. धनसंपदांना संघाचे सदस्य होण्यापासून परावृत्त करण्यासाठी हा नियम होता. एकदा जीवकाने तथागतांना नवीन वस्त्रापासून तयार केलेले चिवर स्वीकारण्याचा आग्रह केला. त्यांनी मूळ नियमात सुधारणा केली आणि भिक्खूंनाही ती सवलत जाहीर केली.

एकदा तथागत श्रावस्ती येथे अनाथपिंडकाच्या जेतवनात वास्तव्याला होते तेव्हा गृहपती अनाथ पिंडक तेथे तथागताच्या भेटीला आला त्याने तथागतांना वंदन केले. तो बाजूला बसला आणि त्याने तथागतांना विचारणा केली की, ‘माणसाने धनार्जन का करावे? कृपया हे स्पष्ट करावे.’

‘तू मला विचारणा केली आहेस म्हणून मी हे स्पष्ट करतो.’

ज्याने परिश्रमपूर्वक धनार्जन केले आहे, बाहुबलाने निढळत्या घामाने धनार्ज केले आहे, विधी संमत अशा न्याय मार्गाने धन संपादन केले आहे. अशा आर्य श्रावकाचे आपण उदाहरण घेऊ या. तो धनामुळे प्रसन्न होतो, आनंदी होतो, आपली प्रसन्नता, आनंद तो कायम राखतो. तो आपल्या मातापित्यांना सुख देतो, आनंद देतो, त्याचा आनंद, त्याचे सुख तो कायम राखतो, तो आपली भार्या, आपली संतती, आपले दास-दासी, आपले सेवक यांना सुख देतो, आनंद देतो. त्याचे सुख आणि आनंद तो कायम राखतो. हा धनार्जनाचा प्रथम हेतू होय.’ या प्रकारे धनार्दन केल्यावर तो मित्रांना, स्नेही जणांना सुखी करतो. आनंदी करतो. त्याचे सुख आणि आनंद तो कायम राहतो. हा धनार्दनाचा दुसरा हेतू होय.

याप्रकारे धनार्जन केल्यावर तो अग्नी आणि पाणी, राजा आणि चोर, शत्रु आणि उत्तराधिकारी यांच्यापासून होणारी हानी टाळतो. तो आपली धनसंपदा सुरक्षित ठेवतो. हा धनार्जनाचा तिसरा हेतू होय. या प्रकारे धनार्जन केल्यावर तो कुलयज्ञ, अतिथीयज्ञ, पितृयज्ञ, राजयज्ञ, आणि देव यज्ञ असे पाच यज्ञ करु शकतो. हा धनार्जनाचा चवथा हेतू होय. याही पलीकडे याप्रकारे धनार्जन केल्यावर तो गृहपती दिव्य सुखाप्रत नेणारे, दिव्यलोकीच्या दिशेने प्रवृत्त करणारे असे दान, अहंकार आणि आलस्य यापासून विरत असलेल्या सर्व कष्टधर्याने आणि विनम्रतेने सहन करणाऱ्या मुक्त, शांत व परिपूर्ण होण्याचा प्रयत्न करणाऱ्या श्रमणांना आणि संत जनांना देतो. हा धनार्जनाचा पाचवा हेतू होय. अनाथपिंडकाने हे जाणले की, तथागत दरिद्रीची आणि दारिद्र्याची प्रशंसा करून त्यांना सांत्वना देत नाही किंवा दारिद्र्याला गौरवांतिक करून दरिद्री जीवन सुखी जीवन होय असे म्हणत नाही. ■ ■

तथागताची सत्यगाथा



देविदास राऊत
(बौद्धाचार्य)
मो. 8668238330



बहुजन सौरभ

# आमदारांनो, चोरी करू नका. रस्ता पक्का बनू शकतो.

**जळगाव जिल्ह्यातील आमदार आणि मंत्र्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता श्री. पाटील यांना रस्त्याबाबत चांगलेच झापले. आधी कैमेरा चालू केला. मग डायलॉग सुरू केले. लोक मला रस्त्याबाबत प्रश्न करतात. माझ्याकडे उत्तर नाही. मला लाज वाटते.’ आमदारांना रस्त्याबाबत लाज वाटण्याची गरज नाही. कमीशन घेतांना लाज वाटली पाहिजे आणि कोणाला झापले? एका नोकराला. ते ही पालकमंत्री समोर. व्वा! काय ड्रामा आहे! बकरी खाणारे लांडगे, कोल्हे तुमच्या सोबत बसले आहेत आणि तुम्ही गिधाडांना विचारले, ‘सांग बकरी कोणी खाल्ली?’ तो काय बिचारा! आमदार खासदार मंत्रीला वाटून झालेल्या निधीमधून उरले सुरले, सांडलेले वेचून खाणारा.**

आमदारांनो, खासदारांनो, मंत्र्यांनो, तुम्ही खरोखर प्रामाणिक असाल तर आजपासून रस्ता, गटार, पाणीची टाकी अणि अन्य सरकारी कामाची वर्क ऑर्डर ऑनलाईन करा. आधी वर्क ऑर्डर जाहिर करा मग भूमिपजन करा. त्यात लिहा.

1) हा रस्ता आधी कधी बनवला होता? 2) यांचा ठेकेदार कोण होता? 3) आता ठेकेदार कोण? 4) रस्ता कोठून कोठपर्यंत? 5) याची लांबी, रूंदी, खोली किती? 6) प्रस्ताव कोणी टाकला होता? निधी कशातून दिला आहे? 7) काम करवून घेणारी एक्जीक्युटीव्ह बॉडी कोणती? 8) सरकार कडून इंजिनिअर कोण? नाव, फोन नंबर सहित. 9) ठेकेदार कडून इंजिनिअर कोण? नांव, फोन नंबर सहित. 10) ठेकेदाराला किती ॲडव्हांस दिला? 11) कामाची मुदत किती, कधीपर्यंत? 12) रस्त्याचे अपेक्षित आयुष्य किती ? 13) ठेकेदाराची दुरूस्तीची जबाबदारी कधी पर्यंत? 14) अर्थमंत्रीला किती टक्के दिले? जर दिले असतील तर. 15) आमदारांनी किती टक्के घेतले? जर घेतले असतील तर. 16) पालकमंत्रीने किती टक्के घेतले? जर घेतले असतील तर. 17) कलेक्टर आणि इंजिनिअर यांना किती टक्के दिले जातील? त्यांना देत असाल तर! आणखी कोणी लाभार्थी असेल तर नावासहित वाटा हिस्सा रक्कम लिहा. 18) याचे मेझरमेंट कोण इंजिनिअर केव्हा करील? 19) याचे बील पेमेंट ठेकेदाराला कधी देणार आहात? 20) जळगाव शहरातील किती रस्ते किती निधी देऊन सुरू केले आहेत? 21) आतापर्यंत किती रस्ते बनवले? किती खर्च आला? पेमेंट किती दिले? 22) बाकीचे बील पेमेंट का दिले नाही? कधी देणार आहात? ही सर्व माहिती ऑनलाईन टाकली पाहिजे. जर आमदार खासदार मंत्री भुमिपुजन करीत असेल तर सोम्या गोम्या चोरांची नांवे टाकण्याऐवजी तेथे बैनर व उपरोक्त 23 मुद्दे टाकले पाहिजे. भोळे, महाजन, गुलाबराव जर तुम्ही लोक जनतेशी खरोखरच इमानदार असाल तर एकदा इतकी इमानदारी दाखवा. जेणेकरून आम्ही जनता रस्ता मोजून खात्री करू कि, हा रस्ता इतक्या निधीचा आहे. आता जळगाव जिल्ह्यातील ज्या आमदारांनी रस्ता गटार किंवा अन्य योजनेचे भुमिपुजन करतांना कुदळ मारून डोचर पाडला असेल तर तेथेही असेच बैनर लावा. मला वाटते, तुम्हाला मिळणारे मानधन इतके जास्त आहे कि तुम्हाला कोणतीही चोरी, लाचखोरी, कमीशन खोरी टक्केवारी, हरामखोरी करण्याची गरज नाही. तरीही जर तुमची भूकमारी, उधारी, कर्जबाजारी होत असेल तर आम्ही नागरिक तुम्हाला तुम्ही मतांचे दिलेले पैसे परत करू. तुम्हाला आत्महत्या करू देणार नाही. ही जबाबदारी मी व्यक्तीशः आणि आम्ही नागरिक घेतो. तुम्हाला भुकेले मरू देणार नाही. पण चोरी करू देणार नाही. जर माझ्या मागणीवर कोण प्रामाणिक आमदार, खासदार मंत्रीला आक्षेप असेल तर तयार राहा. मी तुमची जाहीर मुलाखत घेतो. जर मंडप टाकून, हात जोडून मते मागतात तर मंडप टाकून आम जनतेला इमानदारीने सामोरे गेलेच पाहिजे. बघा, हिंमत असेल तर! इमानदार असाल तर! ■ ■



बहुजन सौरभ

शिवराम पाटील
मो. 9270963122

“ नम्रता हीच खरी सज्जनतेची ओळख! ”



# मा. मुख्यमंत्रीजी, सुशासनासाठी कायमस्वरुपी अभियान राबवा!

*दोन वर्षांपूर्वी, सुंदर माझे कार्यालय, या नावाने अभियान राबविण्याचा जी.आर. सरकारने काढला होता. ह्याचे पुढे काय झाले समजले नाही. मधल्या काळात 'शासन आपले दारी' हा कार्यक्रम सरकारने जिल्ह्या-जिल्ह्यात राबविला. प्रशासकीय सुधारणेचा, समस्या निवारणाचा हा उपक्रम खूप गाजावाजा करत साजरा झाला. दर महिन्याला लोकशाही दिवस, तर महिला लोकशाही दिवस आयोजीत केला जातो. सर्वसामान्यांचे प्रश्न व समस्या सोडविण्याचा हा एक मार्ग आहे.*

मंत्र्यांचा जनता दरबार, खासदार आमदार यांचा ही दरबार भरत असतो. अधिकाऱ्यांचा गावभेट कार्यक्रम व दौरेही होत आहेत. समाधान शिबिरे होत आहेत. प्रशासकीय व्यवस्था लोककल्याणकारी होणेसाठी असे विविध उपक्रम आवश्यकच आहेत. सरकारचे हे सांविधनिक कर्तव्यच आहे. विविध उपक्रम राबविले जात आहेत ह्यासाठी सरकारचे अभिनंदन!

आपले माहितीसाठी सांगू इच्छितो की वर्ष 2010 मध्ये आघाडी सरकारने प्रत्येक मंत्रालयीन विभागाला व्हिजन डॉक्युमेंट तयार करायला सांगितले होते. मंत्री परिषदेत सादरीकरण होवून मान्यता देण्यात आली होती. सामाजिक न्याय विभागाचे व्हिजन डॉक्युमेंट समाज कल्याण विभागाचा संचालक असतांना मी तयार केले होते. यास 17 फेब्रुवारी 2010 ला मंत्रीपरिषदेने मान्यता दिली होती. यातील कोणते निर्णय आणि कधी लागू केले व कोणते अजूनही केले नाही ह्याबाबत चर्चा होण्याची आवश्यकता आहे. राजकीय सत्तेत बदल झाला, सरकार बदलले, प्राधान्यक्रम बदलला. आता, सरकार व्हिजन डॉक्युमेंट तयार करणार असे मिडियात वाचायला मिळाले. एकीकडे असे अनेक उपक्रम राज्यसरकार प्रशासकीय सुधारणा घडवून आणण्यासाठी राबवित असते. त्यात भर पडली ती 100 दिवसाचा प्रशासकीय सुधारणेच्या कार्यक्रमाची. प्रशासकीय सुधारणा reforms आवश्यकच आहेत. केंद्र सरकारने सिव्हिल सर्व्हिसेस रिफॉर्मस बाबत अनेक अहवाल प्रसिद्ध केले आहेत. वाढत्या भ्रष्टाचारावर, प्रशासनाचे राजकियकरण व गुन्हेगारी संबंध यावर वास्तव मांडले. हे रोकण्यासाठी शिफारशी केल्यात. तरी भ्रष्टाचार वाढतच आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध केवळ बोलून होणार नाही, कठोर कृती पाहिजे, ती दिसत नाही. त्यामूळे, काहीच भ्रष्टाचाराची प्रकरणे आणि त्यातील संबंधितांना अटक होण्याच्या घटना घडते आहेत. बोगस शालार्थ आयडी प्रकरण सद्या गाजत आहे. भ्रष्ट अधिकारी कर्मचारी यांचेमुळे घडत आहे. उपसंचालक शिक्षण या महत्वाच्या पदावरील अनेक अधिकारी जेलमध्ये जात आहेत. भ्रष्टाचारास प्रतिबंध आणल्याशिवाय प्रशासकीय सुधारणा कार्यक्रम अधुरा आहे. शिक्षण यासारख्या पवित्र व चारित्र्यवान पिढी घडविणाऱ्या क्षेत्रात भ्रष्टाचार एवढा फोफावला, ह्यास फक्त अधिकारीच दोषी नाहीत, संस्थाचालक आणि त्यांना संरक्षण देणारे नेते व वरिष्ठ अधिकारी ही तेवढेच जबाबदार ठरतात.

काही वर्षापूर्वी सामाजिक न्याय विभागातील शिष्यवृत्ती वाटपात भ्रष्टाचाराचे प्रकरण गाजले. एस.आय.टी. बसली, चौकशी झाली. यात दोषी आढळलेल्या काहींना अटक झाली, काही जमानती वर आहेत. किती अधिकाऱ्यांवर विभागीय चौकशी सूरू झाली? कितींना शिक्षा झाली? पोलीस केसेस कितीजणाविरुद्ध आहेत? काय झाले पुढे? जे भ्रष्टाचाऱ्याच्या अशा गंभीर गुन्ह्यात अडकले आहेत, क्रिमिनल केसेस प्रलंबित आहेत अशांचे निलंबन होणे गरजेचे असतांना, काहींना पदोन्नती व महत्वाची पदे सरकारने दिलीत? सामाजिक न्याय तो हाच का? ऑल इज वेल? अशी प्रकरणे काही दिवस प्रकरण वृत्तपत्रात चालतात आणि नंतर शांत होतात. काही पत्रकार सुद्धा काहीचे बाबतीत सिलेक्टिव होतात. भ्रष्टाचार दिसतो परंतु काहीजण सोयीस्करपणे दुर्लक्ष करतात. इमानदारासोबत मैत्री असावी, साथ व समर्थन असावे, बेईमानासोबत नाही. मात्र, असे बहुदा घडत नाही. शिष्यवृत्ती भ्रष्टाचारात शैक्षणिक संस्थाचालक ही आहेत. म्हणून ही असेल कदाचित, भ्रष्टाचाराचा संरक्षण मिळत असेल. शिक्षण सम्राटांच्या अनेक शैक्षणिक संस्था, शिष्यवृत्ती व ट्युशन फी, यावर बऱ्यापैकी अवलंबित आहेत. एस.आय.टी.ची प्रकरणे शेवटाला गेली पाहिजे. सरकारच्या व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या इच्छा शक्तीवर हे सारे काही अवलंबून असते.

सामाजिक न्याय विभागाची भ्रष्टाचाराची अनेक गंभीर प्रकरणे आहेत, ज्यांची योग्य ती चौकशीच झाली नाही, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंती निमित्त आयोजीत सांस्कृतिक कार्यक्रम, संविधान दिवस साजरा करणे व इतर कार्यक्रमांचे आयोजन, संविधान सप्ताह, जयंती सप्ताह, पुस्तक खरेदी, वस्तू खरेदी, नावीन्यपूर्ण योजना, बार्टीचे संस्थांना पैसे वाटप, स्पर्धा परीक्षा संस्थांना पैसे वाटप, कंत्राटी कर्मचारी भरती, हॉस्टेल सेवा सुविधा, भोजन ठेका, साफसफाई ठेका, अजूनही असतील, तक्रारी होतात, चौकशी आदेशित होते परंतु गंभीरपणे चौकशीच होत नाही. जी चौकशी होते ती क्लीन चिटमध्ये घोषित होते. जेथे भ्रष्टाचार तेथे सामाजिक न्याय कसा होणार? हे साधे सोपे समजत नाही असे नाही. कसेही करून पैसे कमविणे हा धंदा झाला आहे. भ्रष्टाचारात जात, धर्म, पंथ, भाषा, प्रांत, लिंग असा भेद नाही. महापुरुषांचे विचार सांगणारे, अनुयायी म्हणवून घेणारे सुद्धा भ्रष्टाचारात गुंतले असतील तर न्याय कसा होणार? 'बाबासाहेब' यांचे नावाने असलेल्या संस्थांमध्ये भ्रष्टाचार होत असेल आणि तो लपवला जात असेल तर हे फारच चिंताजनक ठरते. अधिकारी-कर्मचारी व लोकप्रतिनिधींना संविधानिक नितीमत्तेचे प्रशिक्षण देण्याची गरच आहे. 'Zero tolerance to Corruption' ही निती अंमलात आणण्याची आवश्यकता आहे. संविधान कीतीही चांगले असो, राबविणारे जर अप्रामाणिक असतील तर संविधान अपयेशी ठरेल. संविधान सभेतील दि. 25 नोव्हेंबर 1949 च्या भाषणात, डॉ. बाबासाहेब सांगून गेले, इशारा दिला. संविधानाला धोका कोणापासून? संविधानास धोका जातीयवादी, धर्मांध, असहिष्णू, स्वार्थी, अप्रामाणिक, लबाड, बेईमान, भ्रष्ट लोकांमुळे निर्माण झाला आहे. यावर ठोस उपाय करण्याची गरज आहे. या व त्या नावाने, प्रशासकिय सुधारणेचे अभियान सुरूच आहे. तरीपण शोषित वंचितांचे जगण्याचे मूलभूत प्रश्न अजूनही सुटले नाहीत, हे वास्तव नाकारता येणार नाही. 100 दिवसाच्या प्रशासकीय सुधारणेचा दुसऱ्या टप्प्याचा निकाल जाहीर झाला. त्यात दिसले की नागपूरच्या प्रादेशिक उपायुक्त सामाजिक न्याय विभागाचा प्रथम क्रमांक आला. मात्र, ही सुधारणा घडवून आणणारे, प्रथम पुरस्कार प्राप्त करून देणारे प्रादेशिक उपायुक्त तथाकथित भ्रष्टाचाराचे प्रकरणात निलंबित झाले आहेत. हे कसे काय घडले? सामाजिक न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांनी नावाला साजेसे काम केले पाहिजे. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांच्या प्रयत्नांची निर्मिती म्हणजे आजचा सामजिक न्याय विभाग. 'बाबासाहेब' यांचे विचार या विभागातील अधिकारी कर्मचारी यांचेत रुजले असते तर भ्रष्टाचार फोफावला नसता. भ्रष्टाचार करणारे व भ्रष्टाचाराला संरक्षण देणारे दोघेही संविधान विरोधी व देशहित विरोधी ठरतात. व्यवस्था परिवर्तनासाठी निष्कलंक चारित्र्याचे लोक व्यवस्थेत पाहिजे. तरच, लोक कल्याणाचे, समाजहिताचे व देशहिताचे काम होईल. व्यवस्था घाबरली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'मला व्यवस्था घाबरते कारण माझेकडे निष्कलंक चारित्र्य आहे'. शासन प्रशासन व्यवस्थेत निष्कलंक चारित्र्याची लोक मोठ्याप्रमाणात असली पाहिजे. या दिशेने प्रयत्न आवश्यक आहेत. प्रयत्न केला, कठोर निर्णय घेवून राबविले तर सहज शक्य आहे. सगळेच वाईट झाले नाही.

शासन प्रशासनातील भ्रष्टाचार थांबला, गैरप्रकार रोकले गेले, जनतेची पिळवणूक थांबली, ठेकेदारांचे/पुरवठाधरकांचे लाड बंद केले, संविधान व कायद्याशी प्रामाणिक राहून काम केले तर खरी प्रशासकीय सुधारणा घडून येइल. शासन प्रशासन व्यवस्था आहेच मुळात चांगलेच करण्यासाठी. या व्यवस्थेत येणारे हाच ध्येयवाद घेवुन येतात. सचोटी व कर्तव्यदक्षता हेच गुण महत्वाचे आहेत. ह्याच अर्थाची संविधान शपथ घेतली जाते. तेव्हा, यांनी भ्रष्टाचारा विरुद्ध, शोषणाविरुद्ध, अन्याय अत्याचाराविरुद्ध कार्यक्रम राबविला पाहिजे. प्रशासकीय सुधारणा दीर्घकाळ टिकतील. अन्यथा 100 दिवसाच्या काळातील प्रशासकीय सुधारणा अल्पजीवी ठरतील. तसेही राजीव गांधी प्रशासकीय प्रगती व गतिमानता स्पर्धा अभियान दरवर्षी होतच आहे. पुरस्कार ही दिले जातात, पुढे काय होते? सर्व सामान्य जनतेचा त्रास कमी झाला नाही, अडवणूक, पिळवणूक होतच आहे. एवढ्या सुधारणा होवूनही भ्रष्टाचार कमी होण्याऐवजी वाढतच आहे. असे असले तरी सुधारणावादी विविध उपक्रम नेटाने राबविणे आवश्यक आहेत. मान मुख्यमंत्री असा प्रयत्न करीत आहेत. त्यासाठी त्यांचे अभिनंदन. मात्र, प्रशासकीय सुधारणेचा लाभ समाजातील शोषित वंचितांना मिळाला पाहिजे. अति मागास समजल्या जाणाऱ्यांना मिळाला पाहिजे. एवढेच नाही तर महिलांना सन्मान व संरक्षण मिळाले पाहिजे. शोषण मुक्त, अत्याचार मुक्त, हुंडा मुक्त महाराष्ट्र असे अभियान पाहिजे. तरच सुशासन येइल. आम्ही, 'दलित अत्याचार मुक्त महाराष्ट्र' हे अभियान राज्य सरकार राबवेल असे 17 फेब्रुवारी 2010 च्या व्हिजन डॉक्युमेंटमध्ये मंजूर करून घेतले होते. परंतु राबविले गेले नाही. का बरे! अनुसूचित जाती, जमातीवर होणारे अत्याचार प्रतिबंधित करण्याचा कायदा आहे परंतू राज्य शासन व यंत्रणा पुरेशी गंभीर नाही असे अनेक प्रकरणात दिसून आले. Atrocity act च्या नियम 16 अंतर्गत, आजच्या घडीला राज्यस्तरीय समिती गठित झाली नाही, 2018 नंतर बैठका नाहीत. ह्याची जबाबदारी कोण घेणार? सरकारचा कोणताही विभाग भ्रष्टाचारमुक्त, शोषणमुक्त नाही. घटना घडली की चर्चा होते. एवढ्यात घडलेली धुळे येथील घटना. कधी नव्हे ते विधिमंडळ समितीच्या धुळे दौऱ्यानिमित्त्य जवळपास 2 कोटीची रोख रक्कम विधिमंडळाची अंदाज समितीच्या प्रमुखाच्या कक्ष अधिकारी यांच्या कक्षात सापडली. फार गंभीर आहे. मा. मुख्यमंत्री यांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतले. रक्कम सापडली म्हणून चौकशी होणार, काही दिवस चालेल, पुढे काय घडेल हे वेळ काळच सांगेल. आमदार समितीशी सबंधित घटना आहे. यापूर्वी रोख सापडली नव्हती परंतु सगळे इमानदारीने, प्रामाणिकपणे, स्वच्छपणे सार होत होते असे नाही. ज्यांच्या हातात सत्ता व अधिकार त्यांना भ्रष्टाचार करण्याची, भ्रष्टाचार लपविण्याची, प्रकरणात चौकशी सुरू झाली तरी ती क्लीन चिटवर आणण्याची कसब आहे. मुख्यमंत्रीजी, इमानदार कार्यालय, इमानदार सचिव, इमानदार अधिकारी, कर्मचारी, इमानदार मंत्री, इमानदार लोकप्रतिनिधी, असे अभियान राबवता येईल का? विचार करा. यातून काही चांगले घडले तर ती खरी प्रशासकीय सुधारणा ठरेल. सुशासन येईल. सुराज्य प्रस्थापित होईल. स्वतःला संविधान वादी म्हणवणाऱ्यांनी, महापुरुषांचे अनुयायी असल्याचे सांगणाऱ्यांनी भ्रष्टाचार, शोषण, पिळवणूक, गैरव्यवहार, अन्याय, अत्याचार, विलंब सारख्या गोष्टींना उजागर केले पाहिजे, वास्तव मांडले पाहिजे, सत्य बोलले पाहिजे आणि सरकारला प्रश्न विचारले पाहिजे. शासन प्रशासन व्यवस्थेतील अशा लोकांनी स्वतः ईमानदार असल्याचे उदाहरण घालून दिले पाहिजे.

मागील वर्षी, पूजा खेडकर या ट्रेनी आय.ए.एस. अधिकाऱ्यांचे वादग्रस्त प्रकरण चव्हाट्यावर आले. तेव्हा मीडियामध्ये खूप चर्चा झाली. एक ज्येष्ठ आय.ए.एस. अधिकारी टीव्ही चॅनेल वरील चर्चेत म्हणाले, सद्यःस्थितीत 80 टक्के सनदी अधिकारी भ्रष्ट आहेत, अकार्यक्षम आहेत. हे तपासण्याची व समजून घेण्याची गरज आहे. असे असेल तर सुशासन कसे येईल? किमान 80 टक्के ईमानदार, प्रामाणिक व कार्यक्षम सनदी अधिकारी व्यवस्थेत असतील तरच न्यायाचे प्रशासन होईल. आम्ही भारताचे लोक आहोत. हा आपला देश आहे. देशाभिमान आहे तर एवढे तर नक्कीच केले पाहिजे. मी सनदी अधिकारी म्हणून एवढी खात्री नक्कीच करु शकतो की मी वाईट काम करणार नाही, चांगलेच करीन, माणसाशी, समाजाशी, देशाशी बेइमानी करणार नाही. असे करणे सहज शक्य आहे. आम्ही स्वतः सनदी अधिकारी म्हणून इमानदारीने, कर्तव्यनिष्ठतेने प्रशासकीय सेवा केली. त्यांचे काही अंशी परीणाम ही भोगावे लागले. परंतू सामाजिक दायित्व, संविधानाशी प्रामाणिक राहिल्याचा आनंद व समाधान वेगळेच असते. माझ्या 29 वर्षाच्या प्रशासकीय काळातील अनुभव, माझे पुस्तक, 'आणखी एक पाऊल', 'प्रशासनातील समाजशास्त्र', व 'प्रशासनात आंबेडकरवाद', यात लिहले आहेत. तेव्हा, सजग नागरिक म्हणून सुद्धा प्रत्येकांनी ही जबाबदारी पार पाडली पाहिजे. तरच 'विकसित भारत '2047' हे स्वप्न पूर्णत्वास येईल. कोणाला वाईट वाटो की राग येवो, सामाजिक न्यायासाठी हे करावे लागेल. व्यवस्था शुद्धीकरण व परिवर्तनासाठी असे करणे गरजेचे आहे. शासन प्रशासनाचा पुढाकार आवश्यक आहे. ■■




माझे मत



ई. झेड. खोब्रागडे
9923756900

## कुलुप किल्ली

अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

रात्र होताच पुजारींनी मंदिराला कुलूप लावले. तेव्हा एक भक्त म्हणाला, 'महाराज! देवालाही कैद करताय? कुलूप का लावता मंदिराला?' त्यावर पुजारीबाबा म्हणाले, 'मी मंदिराला कुलूप यासाठी लावतो की, चुकून एखाद्या ईमानदार व्यक्तीचे ईमान डगमगू नये. चोराचे काय आहे? तो तर कोणतेही कुलूप सहज तोडू शकतो.' त्यावर भक्त म्हणाला, 'होय! आजकाल कुणाचाही भरवसा राहिला नाही. आता चोरांचेच बघा! ते दानपेट्या फोडतात. देवाचे किमती दागीने चोरतात.'पुजारी म्हणाले, 'एवढ्यावरच काही चोरटे थांबत नाहीत, ते चक्क देवाच्या मूर्त्याही चोरून नेऊन विकतात.' 'महाराज! परवा वर्तमान पत्रात मी एक बातमी वाचली. कुलूपाच्या दुकानाचे कुलूप फुटले. मग मनात विचार आला चोरट्यांनी तेथे नेमके काय लुटले? मला वाटते या सृष्टीची निर्मिती करतांना परमेश्वराने काही असेही कुलूपे बनवायला हवी होती की, जी ना बेईमानांच्या कोणत्याही चावीने उघडतील, ना ते त्या कुलूपांना फोडू शकतील.'स्मितहास्य करीत पुजारीबाबा म्हणाले, 'मर्जी परमेश्वराची.' एवढे म्हणून ते निघून गेले. पण याच्या डोक्यातून मात्र कुलूप काही केल्या जात नव्हते. तो विचार करू लागला, 'जगात फक्त माणूस हाच एकमेव प्राणी आहे की, त्याला कुलूपाची आवश्यकता भासते. इतर कोणताही प्राणी कुलूपाचा वापर करत नाही. कुलूप म्हणजे काय? तर ज्या दिवशी माणसांच्या मनात बेईमानी आली त्याच वेळी त्याने कुलूपाचा शोध लावला असावा. पण या जगात कुलूपांचे दोन प्रकार आहेत. सर्वसामान्य कुलूपाला आपण बघू शकतो. पण काही कुलूपे अदृश्यही असतात. आता हेच बघा. आपण आपल्या इच्छा अन् अपेक्षांना कुलूप लावून त्यामध्ये आयुष्याला कैद करून टाकतो. कालांतराने तर त्या कुलूपाची चावी कुठे ठेवली आहे हेही आपण विसरून जातो. पण त्याचवेळी असे वाटते की, अनेक नको असलेल्या आठवणींना बंद करण्यासाठी जर एखादे कुलूप असते तर किती बरे झाले असते. कधीकधी आपण हे देखील अनुभवतो की, जी व्यक्ती कुणाच्या नजरेतून उतरते तेव्हा समोरची व्यक्ति त्याच्याशी असणाऱ्या संबंधाला असे कुलूप लावते की, ते कोणत्याही चावीने उघडणे शक्य नसते. एकदा कुलूप लावले की, ते कायम स्वरूपी बंद करण्यात येते अन् ते आवश्यकही असते, कारण बंद झालेले कुलूप हवे तेव्हा उघडायला ते काही दुकान नाही, तर ते मन आहे. संबंध कसे टिकवायचे असतात हे कुलूपांपासून शिकावे, ते एकवेळ तुटणे पसंत करेल, पण कोणत्याही अलत्या भलत्या चावीने उघडत नाही. चावीने उघडलेल्या कुलूपाला वारंवार उपयोगात आणल्या जाऊ शकते, पण हातोड्याच्या प्रहाराने उघडल्या गेलेले कुलूप मात्र काहीही उपयोगाचे नसते. म्हणूनच कुलूपाची चावी होणे वाटते तेवढे सोपे नाही. त्यासाठी हळुवारपणे कुलूपाच्या काळजात प्रवेश करावा लागतो. मग अशा चावीच्या मनाबरहुकूम कुलूप वागू लागते. इकडे चावी फिरली की कुलूप बंद होते, अन् तिकडे फिरवताच उघडते. या चावीकडूनही बरेच काही शिकता येते. घरापेक्षा दरवाजा छोटा असतो. दरवाज्यापेक्षा कुलूप छोटे असते. कुलूपापेक्षा चावी छोटी असते. पण या इवल्याशा चावीच्या मदतीने सर्व घर सहज उघडल्या जाते. इवल्याशा चावीकडून आपणही हा बोध घ्यावा की, छोट्या छोट्या गोष्टी छोटे छोटे विचारसुद्धा मोठमोठ्या गोष्टींमध्ये परिवर्तीत होऊ शकतात. खरेच आपण स्वतःला बनवू शकू का या कुलूप अन् चावीसारखे? ■■

बहुजन सौरभ




## चिमटा

*चिमटा म्हणजे टाँग्स, हिंदी, उर्दू मध्ये याच्यामध्ये सुद्धा वापरला जातो. मुख्यत: पंजाबमध्ये शीख, सरदार याचा जास्त वापर करतात. साधू लोकांचे एक शस्त्र अनेक कामात ते त्याचा उपयोग करत असतात. शास्त्रीय संगीतात स्वर म्हणून उपयोगात येतो. लोकसंगीतात याचा वापर करण्यात येतो.*



चिमट्याचा स्वयंपाकखोलीत याचा प्रामुख्याने उपयोग केला जातो. चिमट्याने कोणतीही थंड, गरम वस्तू पकडून ठेवता येते. पोटाला चिमटा देणे म्हणजे उपवास करणे, कमी अन्न खावून निर्वाह करणे म्हणजे पोटाला चिमटा घेणे. ड्रॉइंग काढतांना चिमट्याचा उपयोग केला जातो. कारमधील बॅटरीला चार्ज करण्याकरिता चिमट्याचा वापर केला जातो. एखाद्या प्राण्याला किंवा व्यक्तीला चिमटा घेवून दुखविणे म्हणजे चिमटा घेणे.

चिमटे सासू-सुनांचे सर्वश्रूत आहेत. त्यांचे संबंध विळा भोपळ्याचे असतात. कोण कधी कुणाचा चिमटा बनेल काही सांगता येत नाही.

सासूला सुनेचा चिमटा घ्यायचा असेल तर ती आधी मुलीला बोलेल, म्हणजे तो आपोआप सुनबाईला लागत असतो. म्हणूनच म्हण पडली असावी, 'सासू बोले सुने लागे' या दोघींच्या चिमट्यात मात्र अडकतो तो नवरा नावाचा माणूस. बिचाऱ्याचे पार सँडविच होवून जाते हो. तेव्हा या चिमट्यांना जो वेळीच आवर घालू शकतो तो सुखी माणूस समजावा.

पण राजकारणात आणि मीडियामध्ये याचा वापर जास्त प्रमाणात दिसून येतो.

एखाद्याच्या वक्तव्यावर ताशेरे ओढणे किंवा त्याची व्यंगात्मक खिल्ली उडविणे म्हणजे त्याला चिमटा घेणे. हा चिमटा भाषणाद्वारे, लिखाणाद्वारे, चित्राद्वारे व्यंगात्मक स्वरूपात घेण्यात येतो. काही दिवसापूर्वी 'कामरा' नावाच्या गृहस्थाने 'गद्दार' नावाचा असा काही चिमटा घेतला की तो सगळीकडे व्हायरल झाला. महाराष्ट्र शासन या चिमट्यामुळे पार हादरून गेले. काही म्हणाले, त्याला जेलमध्ये टाका, तर काही म्हणाले हा जिथे कुठे असेल त्याला ठेचून काढा. कुणी म्हणाले असे चिमटा काढा पण पद्धतशीर पणे काढा रे! आता पद्धतशीर चिमटा कसा असतो हे त्यांनीच सुचवावे. राजकारणावर काढलेले व्यंगचित्र हे इतिहासापासून चालत आलेले चिमटे. शंकर वीकली, सामना, आर. के. लक्ष्मण यांच्या 'कॉमन मॅन' ने कितीदा दाखवून दिलेत. सत्य बोलणे किती कडू असते यावरून दिसून येते. आज सत्य कथन करणे किती महाग झाले आहे. हे कामरा प्रकरणावरून दिसते. जगश्रेष्ठ संत तुकारामांनी म्हटले आहे की, 'निंदकाचे घर असावे शेजारी'. ते काही उगीच नाही. म्हणून चिमटे घेणाऱ्यांनी चिमटे घेणे सुरू ठेवले पाहिजे. कुणालाही न घाबरता. संविधानाने दिलेला तो आपला हक्क आहे. तो आपण बजावायला पाहिजे. काही चिमटे प्रत्येकाला कळतात, तर काही समजावून सांगितल्याशिवाय कळत नाही. चिमटे घेणारे नेहमीच गोत्यात येतात. त्याने परिणाम कधीकधी एवढे वाईट होतात की त्यांच्या जीवावर बेतन्याचे प्रसंग येतात. ते देशोधडीला लागतात. तस्लीमा नसरीन, सलमान रश्दी, एम. एफ. हुसेन यांचे काय झाले, सगळ्यांनाच माहीत आहे. एन. डी. टी. व्ही. चे वार्ताहर रवीश कुमार यांचे ताजे उदाहरण होय.



दिवाकर शिर्के
मो. 9923862843

या जगात असंख्य लोक आहेत, ज्यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता सत्य जगासमोर मांडण्याचा प्रयत्न केला ते गॅलीलिओ, सॉक्रेटीस होत. विश्वाला सत्याचा मार्ग सांगणारे सिद्धार्थ गौतम बुद्ध, महात्मा फुले, महात्मा कबीर, रामास्वामी पेरियार इत्यादी. सध्या वाट्सॲपवर मीडिया मध्ये चिमटे घेणारे अनेक कवी, व्यंगकार वावरत आहेत. त्यात संपत सरल, प्रख्यात शायर डॉ. राहत इंदोरी. राहत इंदोरी यांचा राजकारणावर प्रसिद्ध चिमटा लक्षात घेण्यासारखा आहे. ते म्हणतात,

**'जो आज साहिब-ए-मसनद है कल नही होंगे ।**
**किरायेदार है जाती मकान थोडी है॥**
**सभी का खून शामिल है यहाँ की मिट्टी में।**
**किसी के नाप का हिंदोस्तान थोडी है॥ '**

**कधी काळी माझ्या लिहीलेल्या**
**ओळी मला आठवतात,**

**'सच्चाई जो लोग बयाँ करते रहते है ।**
**कुछ लोगोके आँखोंमें खटकते रहते है ॥**
**फिर जमाना चाहे उन्हे कुछ भी कहे ।**
**ना वो भटकते, ना इरादे भटकते रहते है ॥** ■■

# धगधगता ज्वालामुखी डॉ. बाबासाहेब आंबेडकर

*'असे किती दिवस आले आणि गेले' परंतु हजारो वर्षे आम्हाला वाट बघावी लागली. तेव्हा कुठे आमच्या बहुजनांच्या जिवनात सोनेरी पहाट उगवली. हजारो वर्षापासून दलीत आणि बहुजन समाज अत्याचार व जुलूम सहन करीत होता. या अत्याचाराविरुद्ध बंड पुकारण्यासाठी 14 एप्रिल हा सोनेरी दिवस उजळला. 14 एप्रिल हा प्रत्येक भारतीयांसाठी सोनेरी दिवसच आहे. या दिवशी धगधगता ज्वालामुखी, महामानव, क्रांतीसुर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म झाला.*

14 एप्रिल ही सोनेरी पहाट उगवली नसती तर, खरच आजही दीनदलीत, बहुजन समाज आणि आपल्या भारत देशाची स्थिती खुप दयनीय राहिली असती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म म्हणजे नव्या युगाचा प्रारंभ होय. त्यांचा जन्म म्हणजे गुलामगिरी नष्ट करून नवक्रांतीचा दिवस आहे. या महामानवाचे आपल्यावर आणि भारत देशावर येवढे उपकार आहेत की, ते शब्दात व्यक्त करूच शकत नाही. म्हणूनच डॉ. बाबासाहेबाला देशाचा चमकता तारा म्हटले आहे. कल्पना करा 14 एप्रिल हा दिवस उगवला नसता तर आजही अस्पृश्य लोकांना गुलामगिरीत आणि दारिद्रीमध्ये जिवन जगावे लागले असते.

हजारो वर्षापासून उच्चवर्णीय लोक जे अस्पृश्य आणि शूद्र लोकांचा जो अमानुष छळ करीत होते. ते आजही तसेच राहिले असते. डॉ. बाबासाहेबांनी आपल्याला नवजन्म दिला आहे. त्यांनी आपल्याला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला आहे. डॉ. बाबासाहेबांचा जन्म म्हणजे नवयुगाचा आरंभ होय. आंबेडकर म्हणजे जातीयतेवर आणि विषमतेवर सोडलेली सुदर्शन चक्र होय.

आंबेडकर म्हणजे जुलुमाविरुद्ध आणि अत्याचाराविरुद्ध लढणारा धगधगता ज्वालामुखी होय.

हजारो वर्षापासून समाज हा जातियतेवर आणि विषमतेवर आधारित होता. डॉ. बाबासाहेबांनी ते फक्त 50 वर्षात पालटून टाकले. संविधान लिहून भारत देशात लोकशाही आणली. प्रत्येक नागरिकाला समान अधिकार मिळवून दिला. मग डॉ. बाबासाहेबांचा जन्म म्हणजे सोनेरी युग आहे हे म्हणणे चुकीचे नाही. आज आपल्या देशामध्ये संविधान लागून 72 वर्षे झाली तरीपण आपण नेहमी वर्तमानपत्रामध्ये वाचतो की, समाजात आजही जातीयता पाळली जाते, दलीत लोकांवर आजही अत्याचार केला जाते. लोकशाही असूनसुद्धा आपल्या देशात आज ही स्थिती आहे तर आधी किती बिकट परिस्थिती असणार. कल्पना करा डॉ. बाबासाहेबांना किती हालअपेष्टा सहन करावे लागले असणार. डॉ. बाबासाहेबांचा जन्म एका गरीब कुटुंबामध्ये झाला होता. त्यांना तर लहानपणापासूनच जातीयता आणि अस्पृश्यता यांचे चटके सहन करावे लागले. आधी तर अस्पृश्य लोकांना शिकण्याचा अधिकार नव्हता, डॉ. बाबासाहेब वर्गाच्या बाहेर बसून शिकले आणि आज त्यांच्यामुळेच आपण सर्व जातीधर्मातील लोक एकत्र बसून शिक्षण घेत आहोत.

डॉ. बाबासाहेब म्हणतात की, माझ्याएवढी गरिबी देशातील कोणत्याच नेत्यांनी बघितली नसेल. त्यांना माहिती होते की समाजामध्ये जर प्रगती करायची असेल तर आधी लोकांना शिक्षित करावे लागेल. अशिक्षित लोकांना त्यांच्यावर अत्याचार, अन्याय होत आहे हे सुद्धा कळत नव्हते. शिक्षण घेतल्याने माणूस विचार करायला लागते. त्यांच्यामध्ये अत्याचाराविरुद्ध लढण्याची ताकद येतो.

डॉ. बाबासाहेबांना समाजातील लोकांवर होणारा अत्याचार पाहून चिड यायची. एखाद्या पशू पक्षी याला तलावातील पाणी पिण्याचा अधिकार आहे. परंतू अस्पृश्य जातीतील लोकांनी पाणी प्यायले तर लोक विटाळ मानायचे. हे बघून त्यांचे रक्त सळसळत होते. म्हणून त्यांनी चवदार तळ्याचा सत्याग्रह केला आणि संपूर्ण अस्पृश्य लोकांसाठी पाण्याचे द्वार खुले केले. पिण्याच्या पाण्यासाठी जगामध्ये एकमेव असा सत्याग्रह झाला. डॉ. बाबासाहेबांनी आपल्याला पिण्याच्या पाण्यापासून तर आपल्या अधिकारापर्यंत हे खूप मेहनत करून लढून मिळवून दिले आहे. त्यांच्या पुण्याईमुळेच आपण सर्व आज स्वाभिमानाने आणि सन्मानाने जिवन जगत आहोत. डॉ. बाबासाहेबांनी सर्व नागरिकांसाठी आणि समाजासाठी येवढे मोठे कार्य करून ठेवले आहेत. तरीपण काही लोक डॉ. बाबासाहेबांना जातीच्या एका चौकटीत बघतात. म्हणजे आजही लोकांच्या मनातून जातीयतेचे विष गेले नाही हेच समजावे लागेल. समाजसुधारक हे कोणत्या जातीचे नाही तर संपूर्ण देशाचे असतात.



प्रिती खोब्रागडे
मो. 7972203297

डॉ. बाबासाहेबांनी संविधानात केलेले काम हे समाजातील प्रत्येक जाती धर्मातील लोकांसाठी समान आहे.

संविधानाने प्रत्येकाला समान न्याय, कायदा आणि अधिकार दिले आहेत. डॉ. बाबासाहेबांनी स्त्रियांसाठी केलेले काम खुप मोठे आहे. आज स्त्रियांना सन्मानाने जगण्याचा जो अधिकार आहे ते डॉ. बाबासाहेबांची पुण्याई आहे. त्यांनी संविधानात स्त्रियांना अधिकार मिळवून दिला. ज्यामुळे आज स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने काम करतात. स्त्रियांना आरक्षण मिळवून दिला. प्रसूती रजा मंजूर केली.

डॉ. बाबासाहेबांनी स्त्रियांसाठी केलेले कार्य कधी न विसरण्याचे आहे. आधी स्त्रियांची खुप बिकट परिस्थिती होती. तिला चूल आणि मूल एवढेच काम होते. स्त्रियांवर खूप मोठ्या प्रमाणात अत्याचार केला जायचा. परंतु आज डॉ. बाबासाहेबांनी संविधानात स्त्रियांना समान अधिकार मिळवून दिला. ज्यामुळे स्त्रिया इंजिनिअर, डॉक्टर, प्रधानमंत्री आहेत. आज आपण ज्या काही स्त्रिया नोकरीवर आहेत त्या सर्वांनी व प्रत्येक स्त्रीने रोज डॉ. बाबासाहेबांचे उपकार मानले पाहिजे.




*'धन्य भीम बाबा तुझी महिमा अपार होती ।*
*तुने समानतेची तरतूद त्या घटनेत केली नसती,*
*तर या देशात राष्ट्रीय एकात्मता राहिली नसती,*
*अन् माझ्यासारख्या मुलीची लिहिण्याची हिम्मत राहिली नसती ॥ '*

देशातील प्रत्येक नागरिक हा संविधानासमोर समान आहे. संविधानापुढे कुणी श्रीमंत किंवा गरीब नाही.

प्रत्येकांसाठी समान कायदे आहेत. आजही काही स्त्रियांना डॉ. बाबासाहेबांनी आपल्यासाठी काय केले हे माहिती नाही. कारण त्यांनी कधी इतिहासच वाचला नाही.

जो इतिहास वाचतो तोच इतिहास घडवतो. डॉ. बाबासाहेबांनी म्हंटले होते की 'वाचाल तर वाचाल' पण आता वाचण्याची संस्कृती लोप पावत आहे. डॉ. बाबासाहेब समजण्यासाठी आधी डॉ. बाबासाहेबांना वाचावे लागेल. डॉ. बाबासाहेबांनी लिहलेल्या संविधानामुळेच आज आपण सर्व जाती धर्माचे लोक मिळुन मिसळून जगत आहोत.

डॉ. बाबासाहेब हे कोणत्या एका जातीचे नाही तर संपूर्ण देशाचा चमकता तारा होता. हा तारा जर नसता तर आजही आपल्या जीवनात अंधारच असता. अंधारातून प्रकाशाची वाट दाखविणाऱ्या या महामानवाची जयंती प्रत्येक नागरिकांनी साजरी करायला पाहिजे. डॉ. बाबासाहेबांची जयंती ही नाचून नाही तर वाचून साजरी केली तर, नक्कीच त्यांनी बघितलेले स्वप्न साकार होतील.

डॉ. बाबासाहेबांनी भारत देशाला दिलेल्या संविधानाची आज प्रत्येक नागरिकांनी रक्षण केले पाहिजे. कारण संविधानामुळेच आपले अस्तित्व आहे.

*'॥ झाले अन् होणार कितीही विद्वान*
*कुणीच टिकणार नाही तुझ्यापुढे*
*खरच कोटी कोटी उद्धारली कुळे*
*भिमा तुझ्या जन्मामुळे. ॥ '* ■■

